UNIVERSAL
LIBRARY
OU_192537
UNIVERSAL
LIBRARY

# गांधीजीच कां ?

['भवितव्य' साप्ताहिकांतील लेखमाला]

★

लेखक :

पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

★

१९४४

प्रकाशक :

महाराष्ट्र ग्रंथ भांडार

गिरगांव, मुंबई ४.

प्रकाशक :
शंकर वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
गिरगांव, मुंबई ४.

मुद्रक :
भाल मांजरेकर
फेमस प्रिंटर्स
त्रिभुवन रोड, मुंबई ४.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

# गांधीजीच कां ?

गांधी साहित्य ४....

# गांधीजीच कां ?

## सर्वात्मक शक्तीचा विकास : : १

आपल्या देशांत गांधीजींना जें माहात्म्य प्राप्त झालं आहे तें अगदी अनन्यसाधारण असं आहे. हें गांधीजींनाच कां मिळालं आणि इतर कुणालाहि तें कां साधलं नाही, या प्रश्नाचा विचार मी कित्येक दिवस करीत आहे. मला वाटतं की या प्रश्नाविषयी मला वाटतं तें 'भवितव्या'च्या वाचकांना अगदी मोकळया मनानं सांगून टाकण्याची वेळ आली आहे.

त्रयस्थाची भूमिका सोडून मी हा आत्मनिवेदनपर लेखनप्रकार अवलंबीत आहे. कारण मला स्वतःला गांधीजींविषयी पूर्वी काय वाटलं व आता काय वाटूं लागलं आहे, हें सरळपणानं सांगितलं तर तें संपादकीय पद्धतीच्या लिखाणापेक्षा अधिक परिणामकारक होईल.

गांधीजींच्या एकेका शब्दानुसार आपल्यापैकी असंख्यांचीं मनं अद्याप हादरून जाऊं शकतात. आपल्या नित्याच्या, रुळलेल्या जीवनक्रमांतून आपल्याला, कांहीं काळ कां होईना, बाहेर खेचून काढण्याचं सामर्थ्य कुणांत असेल तर तें गांधीजींतच आहे.

आपल्यापैकी असंख्यांचं जीवन आमूलाग्र बदलून टाकण्यास कुणी कारणीभूत झाले असतील, तर ते एकटे गांधीजीच.

गांधीजीच कां ?—याला अनेक लोक अनेक प्रकारचीं उत्तरं देतील. ज्यांच्या जीवनक्रमांत गांधीजींमुळे लहानमोठा बदल घडून आला अशांपैकी कित्येकांना हें असं का घडून आलं, हें कदाचित् नीटपणें सांगतांदेखील येणार नाही. ‘हें असं घडलं खरं; पण कां, तें कांही बुवा आपल्याला सांगतां येत नाही’–अशाच स्वरूपाचं उत्तर पुष्कळ जण देतील.

जें जें घडतं तें तें कळतंच असं नाही. **‘घडणं’** आणि **‘कळणं’** यांत जें हें अंतर राहतं त्यामुळंच जीवन गूढ, रहस्यमय, अनाकलनीय असं भासतं.

कित्येक जण आपल्याला सर्व कांही कळून चुकलं आहे, अशा आविर्भावांत नेहमीं बोलत असतात. मार्क्सवादी हे अशांपैकी प्रमुख आहेत. गांधीजींविषयीच नव्हे तर, जगांतील व जीवनांतील कोणत्याहि प्रश्नावर अगदी ठाम स्वरूपाचीं उत्तरं असले लोक ठोकून देत असतात. तीं इतरांना पटतात की नाही, याची दखलगिरी घेण्याची त्यांना मुळीच जरुरी वाटत नाही. वस्तुस्थिति मात्र अशी आहे की, मार्क्सवादावर व मार्क्स–लेनिनच्या नांवावर मॉस्कोंत उदयास आलेल्या सांप्रदायावर अंधश्रद्धा आहे, अशांनाच फक्त मार्क्सवादी कम्युनिस्टांचीं ‘उत्तरं’ पटतात. इतरांना तीं मुळीच समाधानकारक वाटत नाहीत.

गांधीजीच कां? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यांसाठी कोणत्याहि सांप्रदायिक विचारप्रणालीचा आश्रय मी घेणार नाहीं. मार्क्सवादी वाङ्मयानं माझ्या वैचारिक जीवनावर बराच परिणाम केलेला आहे. पण केवळ मार्क्सवादानं अथवा सांप्रदायिक कम्युनिस्ट विचार प्रणालीनं या प्रश्नाचं निश्चित उत्तर मुळींच मिळणार नाहीं. इतर अनेक वादांसंबंधीहि माझं हेंच मत झालेलं आहे. वादशून्य अथवा सांप्रदायशून्य अशी विशुद्ध शास्त्रीय विचारपद्धति व कलात्मक वाङ्मयांत आत्मानुभवांची वाट पुसत पुसत पुढे जाणारी जीवनात्मक विचारपद्धति, या दोहोंच्या आधारानं 'गांधीजीच कां?' या पश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न मी करणार आहें. या दोहोंच्या साकल्याला 'वस्तुकारणात्मक विचार पद्धति' असं नांव मीं दिलं आहे.

घटना सारख्या घडत असतात आणि त्यांमुळे आपल्या मनावर कमीअधिक परिणाम होत असतो. बाह्य घटना आणि आपल्या अंतर्मनावर होणारा त्यांचा परिणाम यांची तर्कशुद्ध संगति लावण्यासाठी वाद अथवा विचारपद्धति उदयास येत असतात. गांधीजी ही आपल्या भारतीय जीवनांतली एक महान घटना होय. तिनं आपल्यांपैकी असंख्यांच्या मनावर किती तरी परिणाम केलेला आहे. आपल्या देशाचं जवळ जवळ सर्व भवितव्य गांधीजींच्याच हातीं आहे, ही गोष्ट आपणांस अधिकाधिक तीव्रतेनं जाणवूं लागली आहे.

स. १९२०-२१ मधील असहकारितेची चळवळ सुरू होण्यापूर्वी आपल्या देशांतील असंख्य जणांचे नित्याचे व्यवहार गतानुगतिकत्वाच्या आंधळया नियमानुसार सुरू होते. एकाएकी असहकारितेची गांधीप्रणित घोषणा देशांत दुमदुमूं लागली. घनदाट काळोखांत

असंख्य दीपज्योती एकाएकीं लखलखूं लागाव्या, तसाच कांहीसा प्रकार त्यानंतर घडून आला.

शेकडों वकिलांनी आपला धंदा सोडून दिला; शेकडों पाटील-पटवाऱ्यांनी आपलीं पिढीजाद वतनं सोडून दिलीं; हजारो विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजे सोडून दिलीं; आणि लक्षावधि लोकांनी ब्रिटिश सरकारशी आपले संबंध सोडून दिले. सारा देश हादरून गेला. भारतीय जीवनक्रम कांहीं काळ पार बदलला. पूर्वीपार चालत आलेल्या आपल्या जीवनक्रमाला एकाएकी एक क्रांतिकारक कलाटणी मिळाली.

त्यावेळीं मी पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी. ए. च्या वर्गात होतों. परीक्षा अगदी जवळ येऊन ठेपली होती. बी. ए. ला त्यावेळीं, निदान आमच्या प्रांतांत, विशेषतः आमच्या घरांत बरेंच महत्त्व होतें. असहकाराचा वणवा पेटतांच ही मानाची परीक्षा असंख्य विद्यार्थ्यांना मातीमोल वाटूं लागली. त्यांपैकी मी एक होतों. हातातोंडाशी आलेली परीक्षा तुच्छ लेखून मी कॉलेज सोडून दिलं.

कोण गांधीजी ? त्यांचा माझ्याशी काय संबंध ? त्यांना मी कधी पाहिलंदेखलंहि नव्हतं. त्यांचा जीवनवृत्तांत मला अगदीच पुसटपणें कळला होता. राजकारणाचा माझा अभ्यास क्रमिक पुस्तकां पलीकडे नव्हता. तर्कशुद्ध विचारसरणीच्या दृष्टीनं पहातां त्या वेळीं मीं एकाएकीं कॉलेज सोडून दिलं हा एक प्रकारचा अविचारच होता. पण माझ्या मनावर जो परिणाम झाला, माझ्या भावनांना, विचारांना व आचारांना तिजमुळं चालना मिळाली, माझ्या भल्याबुऱ्या

चिमुकल्या व्यक्तिजीवनाला जी कलाटणी मिळाली, व्यक्ति आणि समाज, व्यक्ति आणि देश, व्यक्ति आणि राजकीय स्वातंत्र्य इत्यादि द्वंद्वांत अंतर्भूत असलेल्या आशयाचं मला स्वानुभवनिष्ठ दर्शन घडलं,— या सर्वांना एक विशेष असं सामाजिक महत्त्व आहे, असं मला वाटतं. कॉलेज सोडून देणं व्यवहारदृष्ट्या कितीहि अविचारी ठरलं तरी अनुभवाच्या दृष्टीनं, व्यक्तिजीवनाला नवं वळण लावण्याच्या दृष्टीनं, पारतंत्र्यांतील नागरिकत्वाला एक विशिष्ट धार देण्याच्या दृष्टीनं, माझ्याप्रमाणंच माझ्या अनेक समकालीन विद्यार्थ्यांना ती घटना फार मोलाची वाटत असली पाहिजे.

स. १९२०–२१ मध्ये आपल्या देशाला हादरून सोडणारी अशी एक प्रचंड घटना घडली. तिच्या केंद्रस्थानी म. गांधी होते. काय घडलं हें थोडक्यांत सांगितलंच आहे. पण त्यापेक्षा किती तरी अधिक घडून आलं. विशेषतः आजकालच्या तरुणांना ती घटना पहाण्याचं अगर अनुभवण्याचं भाग्य लाभलं नसल्यानं त्यांना त्या घटनेचं विराट स्वरूप स्पष्टपणं समजावं म्हणून ती विस्तारानं सांगितली पाहिजे.

पण हा विस्तार मी टाळणार आहे. मी एवढंच सांगतों की, जें पूर्वी कधीही घडलं नाही तें १९२०–२१ सालीं घडलं. तें खूप प्रचंड होतं, देशव्यापी होतं. त्याचा प्रचंडपणा मला त्या वेळीं चांगला जाणवला. इतरांनाहि तो जाणवला. तेहतीस कोटींच्या आपल्या देशाला जाणवला. आणि थोड्या प्रमाणांत कां होईना, सर्व जगाला देखील जाणवला.

आज १९४४ सालच्या भिंगांतून मी स. १९२०–२१ च्या त्या प्रचंड, अभूतपूर्व घटनेकडे पहात आहें. ती घटना घडविण्यांत माझा कांहीच भाग नव्हता. माझ्या दृष्टीनं ती घटना पूर्णपणें बाह्य स्वरूपाची होती. पण त्या बाह्य घटनेनं माझं अंतर्मन पार हादरून टाकलं. ती घटना प्रचंड होती. मी एक छोटासा तरुण होतों. लहानमोठ्या असंख्य माणसांना आपल्याकडे आकर्षून घेण्याचं प्रचंड सामर्थ्य त्या घटनेंत होतं. असंख्य लोक स्वयंस्फूर्तीनं त्या घटनेकडे आकर्षिले गेले. या असंख्यांपैकी मी एक होतों. मीहि जोराने त्या घटनेकडे आकर्षिला गेलों.

ती घटना म्हणजे एक प्रचंड शक्ति होती. असंख्य मांनवांना वेगानं, अविचारानं, स्वयंस्फूर्तीनं आपल्याकडे आकर्षून घेणं हा त्या शक्तीचा एक मोठा विशेष होता. घरदार, कुटुंब, केवळ वैयक्तिक आशा–इच्छा–आकांक्षा, केवळ स्वार्थ, केवळ स्वहित, केवळ 'स्व'— या सर्वांचं स्वेच्छेनं, स्वयंस्फूर्तीनं, आत्मसमर्पण करण्यास भाग पाडणारी अशी ती विराट शक्ति होती. माझं पुढं काय होईल, माझ्या धनदौलतीचं काय होईल, या सर्व केवळ स्वयंनिष्ट कल्पना, कांहीं काळ कां होईना, अर्थशून्य करून टाकणारी अशी ती प्रचंड घटना होती; अशी ती विराट बाह्य शक्ति होती. त्या शक्तीचं स्वरूप सर्वात्मक होतं. वेगवेगळ्या व्यक्तींच्या ठायीं असणाऱ्या छोट्या छोट्या 'स्व'चं सर्वांसाठीं समर्पण करण्यास भाग पाडणारी अशी ती सर्वात्मक शक्ति होती. 'स्व' आणि इतर सर्व यांच्यांतील भेदभाव कांहीं काळ कां होईना, लुप्तप्राय करून टाकणारी अशी ती सर्वात्मक शक्ति होती.

## सर्वात्मक शक्तीचा विकास

स. १९२०–२१ मध्यें ही प्रचंड व विराट अशी सर्वात्मक शक्ति आपल्या पुण्य भरतभूमीत उदयास आली. याच सर्वात्मक शक्तीचं विकसित रूप १९३०–३२ सालीं जगाच्या दृष्टीस पडलं. स. १९४२ च्या ऑगस्ट महिन्यांत याच सर्वात्मक शक्तीचं अधिक विकसित रूप जगाला दृग्गोचर झालं.

प्रचंड व विराट अशी ही सर्वात्मक शक्ति उदयास कशी आली, तिचा विकास कसकसा घडून आला व आज तिनं कोणतं स्वरूप धारण केलं आहे, हें आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण, या शक्तीचं सत्स्वरूप समजून घेण्यावर केवळ आपलं, केवळ आपल्या देशाचंच नव्हे तर, जगांतील सर्व मानवांचं भवितव्य अवलंबून आहे, असं मला आत्यंतिक श्रद्धेनं वाटूं लागलं आहे.

जगांत सांप्रत दोन मोठ्या शक्तींचा भीषण संघर्ष सुरू आहे. ह्या दोन शक्ति म्हणजे स्वार्थ आणि सर्वार्थ. महायुद्धांत अमानुषपणे झगडणाऱ्या सर्व शक्ति ह्या स्वार्थशक्ति होत. सर्वार्थासाठी एकच शक्ति झगडत आहे आणि ती म्हणजे महात्माजींच्या तेजस्वी नेतृत्वाखालीं उदयास आलेली भारतीयांची सर्वात्मक शक्ति.

या सर्वात्मक शक्तीचं सत्स्वरूप यथार्थतेनं समजून घेणं हें आपलं कर्तव्य आहे. 'गांधीजीच कां?' या प्रश्नाचं उत्तर या सर्वात्मक शक्तीचं स्वरूप समजून घेण्यावरच अवलंबून आहे. कारण गांधीजी ही एक नुसती थोर व्यक्ति नसून ती सर्व जगाला उपकारक होऊं शकणारी, सर्व मानवांना प्रगतीचा मार्ग दाखवू शकणारी अशी एक सर्वात्मक शक्ति आहे.

## विश्वशक्तीचं दर्शन : : २

आपल्या देशाच्या सामाजिक जीवनांत दोनच मुख्य घटक अंतर्भूत आहेत: (१) साम्राज्यवादी ब्रिटिश शासन-शक्ति, व (२) साम्राज्यविरोधी आणि स्वातंत्र्यवादी अशी हिंदी जनशक्ति. हे दोन मुख्य घटक परस्परविरुद्ध आहेत.

आपल्या देशाच्या [illegible] इतर सर्व घटक दुय्यम दर्जाचे आहेत. कारण त्या सर्वांपैकी प्रत्येकाचं कार्यक्षेत्र व विकास वरील दोन मुख्य घटकांपैकी या ना त्या घटकावरच सर्वस्वी अवलंबून आहे. आमचं धर्मकारण, आमचं नीतिकारण, आमचं अर्थकारण, आमचं राजकारण, आमचं ज्ञानकारण अथवा कला, शिक्षण आणि संस्कृति,—हे आमच्या समाजजीवनाचे अनेकविध घटक आहेत. त्यांपैकी प्रत्येकाच्या विकासाला विशिष्ठ मर्यादा आहे. ही मर्यादा म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीचं वर्चस्व. या वर्चस्वाशी विसंगत, अथवा या वर्चस्वाला विरोधक होणारा असा ह्यापैकी कोणत्याहि घटकाचा विकास घडून येणं, ब्रिटिश वर्चस्व कायम असेपावेतों, अशक्य आहे.

धर्मकारणाच्या क्षेत्रांत तुम्ही ईश्वरवादी असा अथवा निरीश्वर-वादी असा, द्वैती असा अथवा अद्वैती असा, बौद्ध, जैन, महंमदीय

अथवा ख्रिस्ती असा,—तुमची धर्म-निष्ठा यांपैकी कोणत्याहि स्वरूपाची असली तरी, त्या निष्ठेला विद्यमान राजनिष्ठेची निश्चित मर्यादा आहे.

ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या उदाहरणावरून हा मुद्दा सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट होईल. कारण ख्रिस्तीधर्म हाच सांप्रतचा राजधर्म आहे. राजधर्मालादेखील जिथं एक निश्चित मर्यादा आहे, तिथं इतर धर्मांची व इतर समाजकारणांची काय कथा?

"ब्रिटिश साम्राज्यहिताला बाधक होईल अशी कोणतीहि गोष्ट न करण्याची लेखी हमी सरकारला आगाऊ लिहून दिल्याशिवाय कोणत्याहि ख्रिश्चन मिशनऱ्याला हिंदुस्थानांत पाऊल टाकतां येत नाही. ब्रिटिश राज्यकर्ते हिंदी लोकांना अन्यायानं, अ-ख्रिश्चन पद्धतीनं म्हणजेच अधार्मिक रीतीनं वागवतात असं ख्रिश्चन मिशनऱ्यांना आढळून आलं तरी त्याविरुद्ध ब्र न काढतां चूप बसून रहाणं त्यांना भाग आहे. मधून मधून असा ब्र काढणारे डिट्रॉइटच्या बिशप फ्रेड्रिक् ब्री. फिशर सारखे महाभाग पुढे येतात. पण या अपराधाबद्दल त्यांची हिंदुस्थानबाहेर हकालपट्टी होते." *

धर्मकारणाच्या बाबतींत वस्तुस्थिति अशी आहे. आपला धार्मिक व्याप ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हितसंबंधानं मर्यादित आहे. ही वस्तुस्थिति पुष्कळ धर्ममार्तंडांना सहसा समजत नाहीं. आपली धर्मनिष्ठा ही अनिर्बंध, स्वतंत्र, स्वयंनिष्ठ व स्वयंपूर्ण आहे असंच त्यांना वाटतं. पण ही समजूत खोटी आहे, अवास्तव आहे. प्रत्येक प्रकारच्या धर्मनिष्ठेला विद्यमान राजनिष्ठेचा लगाम लागलेला आहे.

* पहा Dr. Shridharani: *Warning to the West*, p. 35.

आधी राजनिष्ठा, आधी ब्रिटिश साम्राज्यशाहीचे हितसंबंध, आणि मग देव, मग धर्म, मग नीति, मग सदाचार, मग अर्थकारण, मग राजकारण, मग सर्व प्रकारचं व्यक्तिकारण अथवा समाजकारण अशी वस्तुस्थिति आहे.

जें धर्मकारणाला लागू तेंच इतर सर्व प्रकारच्या समाजकारणांना आणि व्यक्तिकारणांना लागू आहे. आपल्या देशावरील साम्राज्यवादी ब्रिटिश वर्चस्व हें सामाजिकदृष्ट्या सर्वव्यापी आहे. आमच्या समाजजीवनाचं कोणतंहि अंग त्या वर्चस्वाच्या कचाटीतून सुटलं आहे असं नाहीं. नित्याच्या अनेकविध व्यवहारांत, धनगमांत अथवा उद्योगांत ही वस्तुस्थिति प्रत्येकाला प्रत्येक क्षणीं बोचक रीतीनं जाणवत नाही. कारण सामान्यतः प्रत्येक व्यक्तीच्या कार्यक्षेत्राचा व्याप संकुचित असतो व ब्रिटिश शासनशक्तीला तो निरुपद्रवी वाटत असतो त्यामुळे आपल्या प्रत्येक कार्यक्षेत्रावर प्रत्यक्षपणें बाध येतो असं कळत नाहीं. म्हणून अनेकाच्या मनांत भ्रम निर्माण होतो की, आपलीं कांहीं कार्यक्षेत्रं तरी ब्रिटिशवर्चस्व–निरपेक्ष आहेत. पुष्कळ पंडितांना, शास्त्रज्ञांना व कलावंतांना या भ्रमाची बाधा झालेली आढळून येते. पुस्तकं वाचावयाला, विद्या शिकावयाला, ज्ञानप्राप्तीला, शास्त्रीय संशोधनाला अथवा कलानिर्मितीला कसलंहि बंधन नाहीं, असं पुष्कळांना वाटतं. वरवर दिसायला हें खरं दिसतं पण आपल्या कोणत्याहि ज्ञानाचा अथवा कलेचा आविष्कार ब्रिटिश वर्चस्वाला बाधक ठरूं लागताच ब्रिटिश शासनशक्तीचा तडाखा त्याला बसल्या शिवाय रहात नाही.

ही वस्तुस्थिति ओळखणारा पहिला महापुरुष म्हणजे महात्मा गांधी. आरंभी, राजनिष्ठा हेंच सत्य, हीच वास्तवता हें ओळखून गेल्या महायुद्धांत गांधीजी ब्रिटिश शासनशक्तीपुढें पूर्णपणें विनम्र झाले होते. सैन्यभरती व रेड क्रॉस या कामीं त्यांनी ब्रिटिश सरकारला इमानेंइतबारें मदत केली. या कामगिरीबद्दल त्यांना बादशहाकडून कैसर-इ-हिंद पदक देखील मिळालं.

त्या वेळीं आम्हांला लो० टिळक हे किती तरी जहाल वाटत होते. व म. गांधी हे किती तरी मवाळ वाटत होते. गांधीजी म्हणजे एक बावळट साधुपुरुष आहे, त्याला राजकारण कांही कळत नाहीं, तो केवळ एक भूतदयावादी समाजसुधारक आहे, अशी भाषा त्या वेळीं ऐकूं येत होती.

पण गांधीजी केवळ 'राजनिष्ठ' नव्हते. कोणताहि स्वार्थ साधण्यासाठी त्यांनीं राजनिष्ठा पत्करली नव्हती. ब्रिटिश शासन-संस्थेला दैवी इच्छेचा, धर्माचा, नीतीचा, सत्याचा भक्कम आधार आहे, अशी त्यांची प्रामाणिक श्रद्धा होती या श्रद्धेचा एक कळकळीचा आविष्कार, असंच गांधीजींच्या राजनिष्ठेचं स्वरूप होतं. त्यांची राजनिष्ठा म्हणजे 'सत्याच्या एका प्रयोगासारखी' होती. त्यांनी आपली सारी जीवनशक्ति या 'सत्याशी' एकरूप करून टाकली होती. दक्षिण आफ्रिकेंतील अनुभवामुळें, सत्यासाठी सर्वस्वाचा त्याग हा त्यांचा महामंत्र झालेला होता. सत्यनिष्ठा आणि राजनिष्ठा यांच्या एकरूपतेवर त्यांचा त्या वेळीं अढळ विश्वास होता. या विश्वासावरच त्यांचा तत्कालीन जीवनक्रम आधारला होता.

पुढं लवकरच महायुद्ध संपलं. दडपशाहीचे काळे कायदे आपलं उग्र रूप प्रकट करूं लागले. ब्रिटिशांनी दिलेलीं स्वराज्याचीं आश्वासनं बारगळूं लागलीं. जालियनवाला बागेतील भीषण प्रकारानं सारा देश संतापून गेला. हिंदी जनमनांतील असंतोषाची आग त्वेषानं वर उसळून येऊं लागली.—

गांधीजींच्या राजनिष्ठेची व सत्यनिष्ठेची ती कसोटी होती. आमच्या राजकीय पुढाऱ्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेचीहि ती परीक्षाच होती. त्यावेळीं हिंदी स्वातंत्र्याकांक्षेचे मेरुमणी लो. टिळक हे होते. त्यांनी मॉटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणा कायद्याचं स्वागत केलं. 'जें मिळेल तें एका हातानं घ्यावं व अधिक मिळविण्यासाठी दुसरा हात पुढं करावा,' अशा स्वरूपांत स्वातंत्र्याऐवजी प्रतिसहकार वादाची घोषणा टिळकांनी केली. हें शंभर नंबरी राजकारण कदाचित् असेल; पण तें सत्य-कारण नव्हतं.

केवळ राजकारण हा गांधीजींचा जीवनविशेष कधींही नव्हता, आजहि नाही. गांधीजी सत्यकारणी होते व आहेत. काळ्या कायद्यांचा त्यांनी निषेध केला; तसाच व्हाइसरॉयवर झालेल्या हिंसात्मक अत्याचाराचाहि केला. कारण सरकारची अन्याय्य दडपशाही व जनतेची अत्याचारी वृत्ति, ह्या दोन्ही गोष्टी गांधीजींच्या सत्य-अहिंसात्मक श्रद्धेशी व राजनिष्ठेशी विसंगत होत्या. सरकारनें केलेले दडपशाहीचे अन्याय्य कायदे, ही सत्याची राजशासनकृत विकृति होती. हिंसात्मक प्रवृत्तींचा आविष्कार, हीहि हिंदी जनमनकृत सत्याची विकृति होती. ह्या दोन्ही 'विकृति' 'असत्य' म्हणून त्या गांधीजींना सारख्याच

त्याज्य वाटल्या परंतु 'सत्यनिष्ठा' आणि 'राजनिष्ठा' यांची अविभाज्य युति कल्पून या युतीच्या अनुषंगानं जीं कर्तव्यं निश्चित झालीं होतीं तीं पूर्ववत् पार पाडणं गांधीजींना अडचणीचं होऊं लागलं. स. १९१८ ते १९२० मधील परिस्थितिमुळें गांधीजींसमोर व देशांतील सर्व विचारवंतांसमोर नवे प्रश्न उभे राहिले. युद्धारंभी स्वराज्याबाबत दिलेल्या आश्वासनांचा बेधडक भंग करून, उलट स्वराज्याची मागणी करणाऱ्या हिंदी लोकांना दडपून टाकण्यासाठी काळ्या कायद्यांचा उद्दामपणें उपयोग करूं लागलेल्या ब्रिटिश सरकारनं उघड उघड 'सत्यद्रोह' केला, हें गांधीजींना स्पष्ट दिसूं लागलं. 'सत्यनिष्ठा' आणि 'राजनिष्ठा' यांची गांधीजींच्या मनांतील युति या 'सत्यद्रोहामुळे' भंग पावूं लागली. राजसत्तेनं 'सत्यद्रोह' केला म्हणून गांधीजींना 'राजद्रोहा'चा मार्ग पत्करणं भाग पडलं!

गांधीजींच्या सत्यनिष्ठ-राजनिष्ठेवर ब्रिटिश सरकारनं आघात करण्यास सुरुवात केली; तसेंच लोकांच्या हिंसात्मक व अत्याचारी आविष्कारामुळे गांधीजींच्या अहिंसामय सत्यनिष्ठेवर स्वजनांकडूनहि आघात होऊं लागले.

गौतम बुद्धाची आत्मनिष्ठा विचलित करण्यासाठी 'मारा'नं बुद्धाच्या मनावर मारा सुरू केला; ख्रिस्ताची आत्मनिष्ठा विचलित करण्यासाठी सैतानानं येशूला सतावलं; तद्वत् गांधीजींच्या सत्यनिष्ठ-राजनिष्ठेवर सर्व बाजूंनी प्रचंड मारा होऊं लागला.

येशू ख्रिस्त अथवा बुद्ध हे दोन्ही महापुरुष आत्मनिष्ठ होते. गांधीजी हे वस्तुनिष्ठ महापुरुष आहेत. पुष्कळांना हें विधान

चमत्कारिक वाटेल; कित्येकांना तें पटणारहि नाही. पण गांधींजींचं व्यक्तिवैशिष्ट्य हें त्यांच्या आत्मनिष्ठ वृत्तींत नसून त्यांच्या वस्तुनिष्ठ वृत्तींतच साठलं आहे, असं मला वाटतं.

प्रत्येक व्यक्ति थोड्याफार प्रमाणांत आत्मनिष्ठ असणं अपरिहार्य आहे. गांधीजी या नियमाला अपवाद नाहीत. पण बाह्यविश्व-निरपेक्ष आत्मनिष्ठा ही विशुद्ध व आत्यंतिक अध्यात्मवादांत विलीन होते. म्हणून ती पूर्णपणें अंतर्मुख व समाजविन्मुख बनते. उलट पक्षीं, आत्मनिष्ठा जेव्हा बाह्यविश्व-सापेक्ष रूप धारण करते, तेव्हा ती जितकी अंतर्मुख तितकीच समाजाभिमुखहि बनत असते. ज्या आत्मनिष्ठेला बाह्य वस्तूचा अथवा बाह्य घटनेचा नित्य आधार लागतो, ती बाह्यविश्व-सापेक्ष आत्मनिष्ठा होय. आधुनिक विज्ञान-शास्त्रीय दृष्टि म्हणजे याच आत्मनिष्ठेचा एक आविष्कार असून गांधीजींची जीवनदृष्टि ही याच आत्मनिष्ठेचा निराळया प्रकारचा आविष्कार होय.

गांधीजी इतर सर्वांसारखे आत्मनिष्ठ आहेत, हें खरं; पण गांधींजींच्या आत्मनिष्ठेला नेहमी बाह्य वस्तूचा आधार लागत असतो. त्याशिवाय ती जगूंच शकत नाही. ब्रिटिश शासनशक्ति ही बाह्य वस्तु अथवा बाह्य घटना आरंभीं आरंभीं गांधीजींच्या आत्मनिष्ठेचा एकमेव आधार होती. ईश्वराविषयीच्या, सत्याच्या, नीतीच्या धर्माच्या व इतर सर्व ध्येयवादी कल्पना गांधीजींनी ब्रिटिश शासन-शक्तीला समर्पित केल्या होत्या. ईश्वराला मानवी कल्याणासाठीं जें अभिप्रेत आहे तें तो ब्रिटिश शासनसंस्थेकरवी करवीत आहे, अशी

गांधीजींची तेव्हां पूर्ण श्रद्धा होती, म्हणून ते राजनिष्ठ राहिले. आपला ब्रिटिशांशी जडलेला संबंध हा दैवी संकेत (divine dispensation) आहे, असं नामदार गोखल्यांप्रमाणं गांधीजींनाहि प्रामाणिकपणें वाटत होतं. या संकेताच्या पूर्ततेसाठींच गांधीजींनी आरंभीं विशुद्ध राजनिष्ठेची भूमिका घेतली. कारण ब्रिटिश शासनसंस्था ही सत्यप्रिय, न्यायप्रिय, व प्रगतिप्रिय आहे, अशी गांधीजींची त्यावेळीं दृढ श्रद्धा होती. गांधीजींची आत्मनिष्ठा ही ब्रिटिश शासन संस्थेच्या रूपानं वावरणाऱ्या बाह्य शक्तीवरच तेव्हां पूर्णपणें केंद्रित झाली होती.

स. १९१८–२० या दोन वर्षांतील घटनांमुळे गांधीजींच्या या वस्तुनिष्ठ–आत्मनिष्ठेला प्रचंड धक्का बसला. "दैवी संकेतानुसार अस्तित्वांत आलेली ब्रिटिशशासनसंस्था, देवाला कधीहि न रुचणारीं अशीं असत्य, अन्याय्य व सैतानी कृत्यं कशी करूं शकते? माझ्या ईश्वरनिष्ठेचा, माझ्या सत्यनिष्ठेचा एकमेव दृश्य आधार अशी जी ब्रिटिश शासनशक्ति, तीच सैतानी बनली तर माझ्या राजनिष्ठेला काय किंमत उरली?" असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले. ब्रिटिश शासनशक्तीचा आधार अशा रीतीने गळूं लागतांच, दुसऱ्या कुठल्या तरी बाह्य शक्तीचा आधार शोधणं गांधीजींना भाग पडलं. त्यासाठीच गांधीजींना असहकाराच्या सामुदायिक चळवळीची घोषणा करणं क्रमप्राप्त झालं.

या घोषणेला हिंदी जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळाला नसता व ही घोषणा अरण्यरुदनाप्रमाणें निष्फळ ठरली असती, तर काय झालं

असतं, कुणास ठाऊक! ब्रिटिश राजसत्तेला गांधीजी कदाचित् शरण गेले असते व आपली आत्मनिष्ठा राजनिष्ठेतच त्यांनी पुन्हा विलीन होऊं दिली असती. किंवा, आपल्या आत्मनिष्ठेला बाह्यविश्वांत आधार सापडत नाहीं असं पाहून गांधीजी हिमालयाकडे निघून गेले असते व नैराश्याच्या निर्वाणांत त्यांनी आपली जीवनज्योत मालवून टाकली असती!

पण गांधीजींच्या असहकाराच्या घोषणेला भारतीय जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळाल्यामुळें गांधीजींना एका नव्या बाह्य विश्वशक्तीचं दर्शन घडलं. बाह्य वस्तूचा आधार शोधणाऱ्या गांधीजींच्या आत्मनिष्ठेला नवा आधार गवसला. हा आधार म्हणजे स्वराज्याच्या स्वार्थासाठी सर्व क्षुद्र स्वार्थांना लीलेनं तिलांजली देण्यास प्रसंगविशेषीं तयार होणारी, लक्षावधी भारतीयांची सर्वात्मक शक्ति. या नव्या चैतन्यमय विराट् शक्तीचं दर्शन घडतांच गांजीजींनी आपली आत्मनिष्ठा, आपली सारी जीवनशक्ति या सर्वात्मक शक्तीला समर्पित करून टाकली. गांधीजी ही व्यक्ति, या सर्वात्मक शक्तींत विलीन झाली.

आणि म्हणूनच, गांधीजी म्हणजे एक थोर व्यक्ति नसून हिंदी जनतेच्या आंतरिक आकांक्षांना व्यक्तता देणारी अशी विराट सामाजिक व्यक्ति आहे.

साम्राज्यवादी ब्रिटिश शासनशक्ति, व साम्राज्यविरोधी, स्वातंत्र्यवादी हिंदी जनशक्ति यांपैकीं जनशक्तीचं एकमेव प्रतीक असं गांधीजींचं स्वरूप सन १९२०–२१ पासून स्पष्ट झालं.

## असहकाराची घोषणा : : ३

स. १९१८ मध्ये पहिलं महायुद्ध संपलं. ब्रिटिशांचा 'दोस्तां'चा जय झाला. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा विजयोन्माद पराकोटीस जाऊं लागला. युद्ध चालू असतांना केलेल्या उदारमतवादी घोषणांचा व दिलेल्या आश्वासनांचा त्यांना विसर पडूं लागला. अमानुष अत्याचाराचा नंगा नाच हिंदुस्थानांत सुरू झाला. पंजाब, अमृतसर (जालियनवाला बाग) मधील भीषण हत्याकांड म्हणजे तर मृत्यूचं रौद्र तांडवच होतं.

सारा देश हादरून गेला. प्रक्षोभाच्या प्रचंड लाटा जनमनांत उफाळूं लागल्या. खिलाफत प्रश्नांमुळे आमचे मुसलमान भाईहि खवळले. व्यक्तीव्यक्तीच्या मनांतील असंतोषाच्या लहान लहान सरितांना महापूर येऊं लागले. राष्ट्रीय प्रक्षोभाच्या खवळलेल्या महासागराला त्या पुरांमुळे प्रचंड भरती येऊं लागली.

ते दिवस आठवले की अजूनहि माझं मन थरारून जातं. सर्व वाद, सर्व तात्त्विक चर्चा, सर्व शब्द अर्थशून्य वाटूं लागतात. एकच एक दृश्य माझ्या डोळयांसमोर तरंगूं लागतं. जागृत भारताची चैतन्यमय विराट् मूर्ति !—

जें सुप्त होतं तें आता जागृत झालं आहे, जें निराकार होतं तें आता लवकरच साकार होणार आहे, जें अमूर्त होतं तें आता लवकरच मूर्त रूपांत प्रकट होणार आहे, असा आत्मविश्वास भारतीय शरिराच्या नसांनसांतून त्यावेळी उसळूं लागला होता. माझंहि शरीर भारतीयच होतं—

मला त्या दिवसांची चर्चा करावीशी वाटत नाही. त्या दिवसांची स्मृति जागृत होतांच मला फक्त त्या काळांत पुन्हा एक वार त्याच उत्कटतेनं जगावंसं वाटतं. तेंच खरं सजीव जगणं होतं. त्यापूर्वीचं आणि त्यानंतरचं सर्व कांही निर्जीव, निस्सत्व असं प्रेतवत् अस्तित्व होतं—

वस्तुत: किती थोडा वेळ आपण खरंखुरं जगत असतों ! शें-पन्नास वर्षांच्या आयुष्यांत चार-सहा महिनेदेखील आपण खऱ्या अर्थानं जगत नाही. आपण सदा सर्वकाळ, निजलेले असतों, विझलेले असतों, मेलेले असतों. चैतन्यमय जीवनाचे क्षण क्वचित् प्रसंगीं एकाएकी वर उसळून येतात. आणि मग कांही काळ सारं कांही बदलून जातं. सर्व जडता झडून जाते. सारा स्वार्थ, सारी क्षुद्रता नष्ट होते. आपल्या अंतर्यामांत जें पवित्र, जें उदात्त, जें दिव्य असतं तेवढंच सळसळून वर उफाळून येतं.

असंच कांहीसं १९२०-२१ सालीं माझ्या जीवनांत घडून आलं. मला वाटतं, असंख्य भारतीयांच्या जीवनांत असंच कांहीसं घडून आलं—

प्रक्षोभ प्रचंड होता. पण केवळ प्रक्षोभ म्हणजे चैतन्यमय जीवन नव्हे. ज्या घटना प्रक्षोभास कारणीभूत झाल्या होत्या त्या घटनांची पुनरावृत्ति अशक्यप्राय करून टाकणारी नवी परिस्थिति निर्माण करण्याची आवश्यकता सर्व भारतीय मनास त्या वेळीं तीव्रतेनं जाणवूं लागली होती. पण इच्छा असूनहि मार्ग दिसेना.

प्रक्षोभामुळे येणारा प्रतिकार व्यक्त करण्यासाठी मार्ग नव्हता. आमच्या लोकांना जनावरांप्रमाणे खाली माना घालून जबरीनं हातापायावर सरपटावयास लावलं. आमच्या असहाय्य, निःशस्त्र आयाबहिणींवर गोळ्या झाडल्या. मनुष्य या दृष्टीनं आम्हांला कवडीचंदेखील मोल उरलं नव्हतं. भारतीय अस्मिता छिन्नविच्छिन्न झाली. अपमानित भारताच्या पददलित हृदयांतून रक्ताचे पाट वाहूं लागले.

'**शठं प्रति शाठ्यम्**'—'ठोशाला ठोसा' ही भाषा आम्हांला चिरपरिचित होती. लोकमान्यांनी या भाषेस भारतीय अध्यात्मवादाचा आधार देऊन राष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती. पण एका भारतीयानं दुसराच सूर काढला. '**शठं प्रत्यपि सत्यम्**'—असा तो सूर होता. हा सूर भारतीयांना ऐकूं येईनासा झाला होता. त्याचा पूर्ण विसर पडला होता. तरी तो सूर अपरिचित नव्हता. किंबहुना भारतीय अस्मितेचं सार या सुरांत जितक्या पूर्णत्वानं ग्रथित झालं होतं तितकं तें दुसऱ्या कशांतहि ग्रथित झालं नव्हतं. फक्त त्याची आठवण ताजी करण्याचाच आवकाश होता. पहिल्यापहिल्यानं पुष्कळांना बिचकल्यासारखं वाटलं. राष्ट्रीय प्रक्षोभाच्या प्रचंड कोलाहलापुढे हा नवा सूर अगदीं सौम्य वाटूं लागला.

पण हळू हळू वातावरण निवळूं लागलं. विस्मृति विलोपूं लागली. नव जागृति अंतर्यामांत उदय पावूं लागली. हाच आपला सूर, हीच भारतीयांची चैतन्यमय अस्मिता याची खूण पटूं लागली.

पंजाबांतील लष्करी अराजक व जालियनवाला बागेतील हत्याकांड यांचा परिणामकारक निषेध, खिलाफतची प्रतिष्ठापना व स्वराज्याची घोषणा हे प्रश्न कॉंग्रेस व खिलाफत परिषद् यांच्यासमोर येतांच कोणत्याहि जुन्या पुढाऱ्याला निश्चित मार्गदर्शन करतां येईना. शाब्दिक ठरावापलीकडे कुणाचीहि मजल जाईना.

अखेरीस खिलाफत परिषदेसमोर भाषण करतांकरतांच गांधीजींना असहकाराची कल्पना सुचली. या अभिनव कल्पनेची विशाल व्याप्ति गांधीजींना व इतरांना नंतर लगेच प्रतीत होऊं लागली. सत्य, अहिंसा व असहकार, ही कल्पनात्रयी साऱ्या देशांत दुमदुमूं लागली. कॉंग्रेसलाहि या कल्पनेला मान्यता देणें भाग पडलें. नागपूर अधिवेशनांत गांधीजींनी कॉंग्रेस पूर्णपणें जिंकली. गांधीजींना विरोध करण्यासाठी चंग बांधून आलेले देशबंधु चित्तरंजन दास अखेरीस गांधीजींपुढे विनम्र झाले. सर्व अंतर्विरोध विलयास गेले. असहकाराचा ठराव पूर्ण मतैक्यानं पास झाला. तो ठराव म्हणजे भारतीय ऐक्याची स्फूर्तिदायक घोषणा होती. भारतीय ऐक्याला इतकी चैतन्यमय मूर्तता त्यापूर्वी व त्यानंतर कधीच प्राप्त झाली नाही.

आंधळ्या प्रतिकाराच्या मार्गानं स्फोट पावूं पाहणाऱ्या भारतीय प्रक्षोभाला चांगली वाट मिळाली. हा मार्ग नवा होता, विचित्र होता.

अभूतपूर्व होता. त्याला वैयक्तिक व वैचारिक इतिहास थोडासा होता. पण सामुदायिक व सामाजिक इतिहास मुळीच नव्हता. रूढ व प्रतिष्ठा पावलेल्या सर्व समरनीतीशी अगदी विसंगत असा हा नवा मार्ग होता. शत्रूवर मारा करण्याऐवजी आपल्या मनावरच मारा करावयास भाग पाडणारा, प्रत्येक भारतीयाला अंतर्मुख बनवून स्वयंप्रेरणेनं उत्स्फूर्त करणारा, असा हा मार्ग होता.—

'तुला पंजाबच्या लष्करी अराजकाची व जालियनवाला बागेतील हत्याकांडाची चीड आली आहे ना ?

मग या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी तूं काय करणार ?

तुला स्वराज्य पाहिजे ना ?

मग तें प्राप्त करून घेण्यासाठीं तूं स्वतः काय करणार ?—

तुला काय करतां येण्यासारखं आहे ?

तूं बंदूक घेऊन इंग्रजांना ठार करूं शकतोस कां ?

कुठं आहे बंदूक ?

नाहीं ना ?

मग तूं काय करणार ?

तुला काहींच करता येण्यासारखं नाहीं कां ?

आहे तर—**असहकार** !

ब्रिटिश राजवटीचा संबंध येतो त्या त्या सर्व गोष्टींशी पू असहकार !

काय तुला एवढंहि करतां येत नाही ?

तुला एवढीशीहि झीज सोसतां येत नाही ?

मग ब्रिटिशविरोधी प्रक्षोभाच्या व स्वराज्याच्या बाता कशाला मारतोस ?...

ब्रिटिश आपल्यावर राज्य करतात ते आपल्याच सहकार्यामुळं करतात.

आपण सगळयांनी ब्रिटिश राजवटीशी पूर्ण असहकार केला तर ही सत्ता लगेच नष्टप्राय होऊन जाईल.

तुला करतां येईल तेवढं तर तूं कर.

आणि असं काय मोठसं करायचं आहे ?

फक्त **असहकार** !

जें सर्वांना शक्य आहे तेंच गांधीजींनी व कॉंग्रेसनं आपल्याला करावयाला सांगितलं आहे.

नुसता **असहकार** !

कांही काळ अत्यल्पसा त्याग.

सर्वांच्या अत्यल्पशा त्यागातून केवढी प्रचंड राष्ट्रीय शक्ति निर्माण होईल !

आपल्याच सर्व लोकांसाठी, आपल्याच सर्वार्थासाठी आपल्या क्षुद्र स्वार्थाचा थोडासा त्याग.

काय कठीण आहे यांत ?

कांहीच नाही !

असहकार !—अन्यायाशी, अमानुषतेशी, असत्याशी असहकार !

किती साधी, किती उदात्त, किती दिव्य कल्पना आहे ही !

'हे सुंदर रेशमी कपडे—ही आकर्षक वेषभूषा—ही मोहमयी स्वदेहपूजा—हे गुलामगिरीचे मायावी पाश !—

आपल्या असंख्य देशबांधवांना अखंड उघडंनागडं रहावं लागतं. आपल्या असंख्य आयाबहिणींना लाज झाकण्यापुरतंदेखील वस्त्रप्रावरण मिळत नाही. आपल्या असंख्य निराश्रितांना झाडा-झुडपांचा देखील आसरा मिळत नाही. असे निराधार, निराश्रित, उघडेनागडे अर्धपोटी देशबांधव आपल्या देशांत हजारो, लाखो, आहेत ना ? आपल्या सर्व देशबांधवांना सुखाच मानवी जीवन

मिळावं याचसाठी आपल्याला स्वराज्य पाहिजे ना ? काय केलं आहे आपण या आपल्याच हाडामासाच्या स्वजनांसाठी ?—

'फेक हे सुंदर रेशमी कपडे, सोड ही मोहमयी स्वदेहपूजा, तोड हे गुलामगिरीचे मायावी पाश. आणि विशुद्ध झालेल्या मनानं अन्यायाचा, अमानुषतेचा, असत्याचा धीरोदात्त प्रतिकार करण्या-साठी निश्चयानं पुढं हो. गुलामगिरीच्या या नादान जीवनापेक्षा त्यागाचं व सत्य-अहिंसामय मानवतेचं जीवन किती तरी उदात्त, दिव्य आहे !—

'आत्मज्ञानाची नित्य महति गाणारे आम्ही भारतीय लोक ! आत्मोन्नतीसाठी संसारत्याग करणारे आम्ही विरागी लोक ! आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्' असा अभिमान बाळगणारे आम्ही त्यागी लोक ! आमच्या साऱ्या अभिमानाच्या, स्वदेशाभिमानाच्या चिंधड्या उडत असतां, आम्हांला त्याचा प्रतिकार करण्यासाठी, आम्हांला आमच्या भारतीय अस्मितेची अब्रू राखण्यासाठी असहकाराइतका थोडादेखील त्याग करतां येणार नाही कां ?'

—असहकारितेच्या तेजस्वी घोषणेचं आवाहन हें असं होतं. गांधीजींचा असहकार म्हणजे भारतीय अस्मितेची अत्युच्च भरारी होती. वेदोपनिषदांपासून शंकराचार्यांपर्यंतच्या सर्व भारतीय शिकवणींत जें जें उज्ज्वल, उदात्त व दिव्य होतं तें तें सर्व गांधी-प्रणीत असहकारतेंत जिवंत, जोरदार स्वरूपांत सामावलं होतं. या आवाहनानं सर्व सुजाण–अजाण भारतीयांच्या चिरसुप्त अस्मितेलाच

स्पर्श केला. भारतीयांची निद्रिस्त अस्मिता खडबडून जागी झाली. अचेतन होतं ते सचेतन झालं. सर्व संचिताचं सामर्थ्य घेऊन भारतवर्ष स्वजनांनाच नव्हे, तर सर्व मानवी जगाला आवाहन करूं लागला—'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान्निबोधत'!

या आवाहनानं मी खडबडून जागा झालों. माझ्या अंत.-करणातील सारं सुप्त भारतीयत्व कांहीं काळ वर उसळून आलं. मी कॉलेज सोडलं. सुंदर रेशमी कपडे मीं फेकून दिले. खादीचे जाडे-भरडे कपडे वापरूं लागलों. माझी बहुतेक सर्व कामं मी स्वत: करूं लागलों. स्वावलंबनाचं स्वयंपूर्ण जीवनाचं खडतर व्रत पत्करण्याचा निश्चयात्मकतेनं प्रयत्न मी करूं लागलों. सत्य, अहिंसा, व सर्वस्व-त्याग, यांच्या खडतर मार्गानं मी जाऊं लागलों. माझ्या भावना, माझे विचार, माझे आचार या सर्वांत क्रांति झाली. एका नव्या चैतन्यमय जाणिवेनं मी जगूं लागलों.

पण हें सर्व थोडे दिवसच. कारण खऱ्या चैतन्यमय जाणिवेनं जगणं हें किती कठिण, किती कष्टप्रद आहे! कदाचित् मी दीर्घकाळ-पावेतों हें जीवन जगूं शकलों असतों. पण एका अनपेक्षित प्रकारानं माझ्या मनाला जबरदस्त धक्का बसला. हा धक्का देण्यास गांधीजीच कारणीभूत झाले. भारतीयांच्या नवजीवनाचं प्रतीक निदान माझ्या-पुरतं भंगून गेलं. भंगलेल्या मूर्तीची पूजा करणं अशक्य झालं.

## विराट आंदोलनाचा बळी! : : ४

स. १९२१ च्या एप्रिलमध्ये लॉर्ड रीडिंग हिंदुस्थानचे व्हाइसरॉय झाले. त्यावेळीं असहकाराचं आन्दोलन अत्युच्च शिखराला पोचलेलं होतं ब्रिटिशांच्या साम्राज्यसत्तेची प्रतिष्ठा शून्यवत् करून टाकणारं हें आन्दोलन दडपून टाकण्यासाठी काय करावं हें ब्रिटिश-सरकारला कांही काळ तरी कळेनासं झालं होतं. पंजाबांतील लष्करी अराजकाची व जालियनवाला बागेतील हत्याकांडाची पुनरावृत्ति हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांत करून दाखवणं सरकारला अशक्य थोडंच होतं! पण पंजाब प्रकरणामुळं आन्दोलन देशव्यापी झालं होतं, त्याची सर्वत्र पुनरावृत्ति केल्यास जनतेचा प्रक्षोभ कोणत्या थराला पोचेल याचा अंदाज तेव्हां कुणालाहि करतां येत नव्हता. शिवाय पूर्णपणें अहिंसात्मक अशा प्रचंड सामुदायिक आन्दोलनाविरुद्ध हिंसेचं शस्त्र उचलणं हें तत्कालीन जागतिक लोकमताविरुद्ध असल्यानं या नाविन्यपूर्ण विराट् सामुदायिक आन्दोलनाचा गाभा ज्या अत्युच्च व उदात्त नैतिक भूमिकेंत साठविला होता, त्या नैतिक भूमिकेला गालबोट लावून, त्या चळवळीचा आधी तेजोभंग करून मग ती चेचून टाकणं हा मार्ग ब्रिटिश राज्यकर्त्यांना आवश्यक वाटला.

ही नाजुक कामगिरी पार पाडण्यासाठी लॉर्ड रीडिंग यांना हिंदुस्थानचा व्हाइसरॉय नेमले. या अभूतपूर्व राजकीय चुरशींत अग्वेरीस लॉर्ड रीडिंगची सरशी झाली.

तो प्रसंग मी कधीहि विसरणार नाहीं. असहकाराच्या विराट्, अभूतपूर्व व नैतिक दृष्ट्या अति उदात्त अशा आन्दोलनाशी माझी सारी जीवनशक्ति पूर्ण समरस झाली होती. सर्व क्षुद्र वैयक्तिक स्वार्थांना सुजाणपणें बाजूला सारून एकाएकी मूर्तस्वरूपास आलेल्या आम्हां भारतीयांच्या सर्वात्मक शक्तीचा पराभव करण्याचें सामर्थ्य कुणालाच नाही, अशी श्रद्धा असंख्याच्या अंत:करणांत तेव्हा होती, यापैकीच मी एक होतों. आम्हां असंख्यांच्या या श्रद्धेला प्रचंड, सामाजिक महत्त्व त्यावेळी प्रत्यक्षपणें प्राप्त झालं होतं. चैतन्यमय जाणिवेच्या रूपानं अशा नव्या व्यक्त झालेल्या या सामाजिक श्रद्धाशक्तीला यत्किंचित्हि धक्का न पोचूं देणें हीच गांधीजींच्या नव्या नेतृत्वाची कसोटी होती.

भारतीयांच्या या नवोदित सर्वात्मक शक्तीच्या आंतरिक मर्मावर प्रहार करण्यासाठी लॉर्ड रीडिंग टपून बसले होते. त्यांनी बहारदार अत्यंत धूर्त असा डाव टाकला. महंमदअली व शौकतअली यांचा कांही गुप्त पत्रव्यवहार व कांही जाहीर भाषणांचे अहवाल त्यांनी मिळविले. अलीबंधु हे त्यावेळीं गांधीजीचे डावे-उजवे हात होते. गांधीजी व अलीबंधु ही त्रयी म्हणजे व्यापक आन्दोलनांतून उदयास आलेल्या भारतीय ऐक्याचा ब्रिटिश साम्राज्यसत्तेवर रोखून धरलेला असा त्रिशूळ होता. या त्रिशूळाचीं तिन्ही टोकें बोथट करून

टाकतांच भारतीयांच्या नवोदित सर्वात्मक शक्तीचा तात्रोडतोब तेजोभंग होईल, हें लॉर्ड रीडिंग जाणून होते. त्यांनी गांधीजींना भेटीला बोलावलं. या भेटीचं कारण मुद्दामच गुप्त ठेवलं. जनतेला वाटलं, बलाढ्य ब्रिटिश सरकार आपल्या नेत्यासमोर नमलं. आशा उचंबळूं लागल्या. आत्मविश्वास पराकोटीस पोचला. एक वर्षाच्या आंत 'स्वराज्य' प्राप्तीविषयीं जनमन अधिकाधिक निःशंक होऊं लागलं.

अशानं लोकांच्या सर्व आशा एकाएकी रसातळास गेल्या. जनतेच्या आत्मविश्वासाला जबरदस्त धक्का बसला. भारतीयांच्या नवोदित सामाजिक श्रद्धाशक्तीच्या ठिकऱ्या ठिंकऱ्या उडाल्या. जनतेच्या सर्वात्मक शक्तीचा तेजोभंग करण्यांत लॉर्ड रीडिंग यशस्वी झाले!—

लॉर्ड रीडिंग यांचा धूर्त डाव असा होता— 'महात्माजी, आपल्या असहकाराच्या आन्दोलनाची नैतिक भूमिका फार उच्च व उदात्त आहे, हें मला मान्य आहे. मला या भूमिकेबद्दल अत्यंत आदर वाटतो. ती कायम आहे तोवर असहकारी आन्दोलनावर कसलाहि आघात करणं हें नैतिकदृष्ट्या अयोग्य होईल, याची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच, आपल्या व्यापक चळवळीला हरकत आम्हीं घेतली नाहीं...पण अलीबंधु हे तुमचे डावे-उजवे हात आहेत ना? हें पहा ते काय लिहितात आणि काय बोलतात तें. त्यांची भाषा पूर्ण अहिंसामय आहे असं आपणाला प्रामाणिकपणं वाटतं कां? ही भाषा हिंसेला प्रोत्साहन देणारी नाहीं कां? तरीहि मला दडपशाही करावयाची नाहीं. मनुष्य स्खलनशील आहे. अजाणतेपणीं क्वचित्

प्रसंगीं चुका होतात. उच्च नैतिकता हा आपल्या आन्दोलनाचा प्राण आहे. त्याला नख लागूं नये अशी माझी उत्कट इच्छा आहे. केवळ उच्च नैतिकतेच्या दृष्टीनं मी आपल्यापासून एकाच गोष्टीची अपेक्षा करतों. ज्या भाषेंतून हिंसेला प्रोत्साहन देण्याचा ध्वनि सूक्ष्मपणें उमटतो, अशी भाषा वापरल्याबद्दल अलीबंधूंनी फक्त दिलगिरी प्रदर्शित करावी. मला वाटतं आपल्याला अभिप्रेत असलेल्या अहिंसेच्या उदात्त प्रमेयाशी माझी ही अत्यल्प मागणी पूर्ण सुसंगत आहे.....'

गांधीजींनी व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांची मागणी मान्य केली. त्यांनी अलीबंधूंना दिलगिरी प्रदर्शित करण्यास भाग पाडलें. गोष्ट अगदी साधी होती. कदाचित् केवळ विशुद्ध तात्त्विक दृष्ट्या गांधींनी जें केल तें बरोबरहि असेल; त्यांना दोष देण्याची माझी बिलकुल इच्छा नाही. जें झालं तेंच फक्त सांगायचं आहे. अली-बंधूंच्या खेदप्रदर्शनाला क्षमेचं, याचनेचं, शरणागतीचं रूप मिळालं. ब्रिटिशांच्या बलाढ्य साम्राज्यशक्तीपुढे गांधीजींनी, थोडीशीच कां होईना, पण मान वाकविली ! भारतीयांची प्रचंड साम्राज्यविरोधी शक्ति अवमानित झाली. तिचा तेजोभंग झाला!—

काय करायला पाहिजे होतं गांधीजींनी ? सत्य-अहिंसेवरील अविचल श्रद्धेतच गांधीजींचं आत्मतेज साठवलं नव्हतं कां ? या आत्मतेजाच्या आधारावरच गांधीजींचं भारतीय नेतृत्व उभारलं होतं ना ? सत्य-अहिंसेला थोडीशी देखील बाधा आणणाऱ्या गोष्टीचा निषेध करणं हें गांधीजींचं प्राप्त कर्तव्य नव्हतं कां ? अलीबंधूंना

दिलगिरी व्यक्त करायला लावतांना गांधीजींनी आपल्या विशुद्ध तत्त्वनिष्ठेचाच अविष्कार केला नाहीं कां?

असेल, हें सर्व खरं असेल पण या खेदप्रदर्शनाचा प्रत्यक्ष परिणाम अगदी विपरीत झाला. असहकाराच्या प्रचंड सामुदायिक आन्दोलनाला तेव्हांपासून ओहोटी लागली. आणि सरतेशेवटीं आन्दोलननिर्मित अभूतपूर्व भारतीय ऐक्य छिन्नविच्छिन्न होऊन त्याचे तुकडे तुकडे झाले. तेजोभंगामुळें विकीर्ण झालेल्या साम्राज्य-विरोधी आन्दोलनावर आघात करणं सरकारला सोपं गेलं. पहिल्याच झटापटींत साम्राज्यसत्तेच्या बुद्धिमान प्रतीकानं भारतीयांच्या भावना-प्रधान सर्वात्मक शक्तीला खाली ओढलं. जें उत्कटतेनं वाटलं, जें असंख्यांच्या धीरोदात्त त्यागानं आकारास आलं, आणि जें प्रत्यक्षाच्या आधारावर अपेक्षिलं, तें सारं भराभर कोलमडून पडलं!

भारतीयांच्या नवजीवनाचं प्रतीक निदान माझ्यापुरतं दुभंगून गेलं. भंगलेल्या मूर्तीची पूजा करणं मला अशक्य झालं—असं मी म्हटलं होतं त्याचा इतिहास हा असा आहे.

गांधीजींनी लॉर्ड रीडिंगच्या धूर्त सूचनेला मान्यता देण्यांत चूक केली असं मला अजूनहि वाटतं. गांधीजींनी व्हाइसरॉयना असं साफ सांगायला पाहिजे होतं की, अलीबंधूंनी कोणताहि गुन्हा केला असल्यास त्यांच्यांवर खुशाल खटला भरा. पण त्यांच्यांकडून खेदप्रदर्शनाची मागणी करण्याचा आपल्याला कांहीं एक अधिकार नाहीं. केवळ संघटित हिंसेवरच पूर्णपणें अधिष्ठित असलेल्या आपल्या

राजशासन शक्तीला आम्हांला नैतिक दृष्ट्या पापी ठरविण्याचा काय हक्क आहे? अलीबंधूंनी अहिंसेचं उल्लंघन केलेलं असल्यास त्यांना या विशिष्ट अपराधाबद्दल शासन करण्याचा अधिकार फक्त कॉंग्रेसला आहे. इतर कुणालाहि नाहीं. ज्या ब्रिटिश शासनाला न्यायाचं, नीतीचं व सत्याचं यत्किंचित्हि अधिष्ठान नाहीं, त्या शासनसंस्थेच्या अधिपतीला आमच्या नितिमत्तेवर, आमच्या सत्य-अहिंसेवर अधिक्षेप करण्याचा कसलाहि अधिकार नाहीं. संघटित हिंसेवरच सर्वस्वी आधारलेल्या ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या या राज प्रतिनिधीनं, अलीबंधूंची भाषा हिंसेनं डागळलेली आहे असा आरोप करणं म्हणजे सैतानानं 'अधर्म मातला' अशी ओरड करण्या सारखंच होय.

हे असं सडेतोड उत्तर असहकाराच्या उच्च व उदात्त तात्त्विक भूमिकेशी अधिक सुसंगत झालं असतं. कारण, सरकारनं खटले भरल्यास आपला कसलाहि बचाव द्यावयाचा नाहीं, असं कॉंग्रेसनं ठरविलं होतं. ब्रिटिश शासनसंस्थेला व न्यायालयांना नैतिक अधिष्ठान उरलं नव्हतं, म्हणूनच असहकार उदयास आला होता. व्हाइसरायशीदेखील असहकाराच्या उच्च नैतिक भूमिकेवरून बोलणं, हेच गांधीजींचं आद्य कर्तव्य होतं—

पणं काय झालं कुणास ठाऊक, गांधीजी चळले. व्हाइसरॉयना आपल्या वैयक्तिक प्रामाणिकपणाचा पुरावा देण्याच्या भरीस पडून त्यांनी भारतीयांच्या विराट् सामुदायिक आंदोलनाचा त्यावेळीं बळी दिला. व्यक्ति या नात्यानं गांधीजींनी जें केलं तें कदाचित् बरोबर

असेल; पण हिंदी जनतेच्या साम्राज्यविरोधी आघाडीचा नेता या नात्यानं गांधीजी त्यावेळीं पाहिजे तेवढे तेजस्वी ठरले नाहींत, असं मला त्यावेळींहि वाटलं व आजहि तसंच वाटतं.

पण गांधीजींनी त्यावेळीं जी चूक केली ती त्यांनी आतां साफ सुधारली आहे. म्हणूनच भारतीय-साम्राज्यविरोधी जनशक्तीचं एकमेव प्रतीक असं स्वरूप गांधीजींना आज पुन्हां प्राप्त झालं आहे. गांधीजींच्या व्यक्तित्वाचा हा विकास अभूतपूर्व व अनन्यसाधारण असा आहे.

पण स. १९२१ ते स. १९४२ या २१ वर्षांत मी व माझ्या-प्रमाणेच इतर अनेक लोक गांधीजींपासून किती तरी दुरावले. या मध्यंतरीच्या काळांत किती तरी नवे विचारप्रवाह उदयास आले. फेरवाले, नाफेरवाले, कायदेमंडळवाले, बहिष्कारवाले, कायदेमंडळांत जाऊन प्रतिसहकार करणारे, म्हणजे मंत्रीमंडळाला अनुकूल असलेले, कायदेमंडळांत जाण्याला अनुकूल परंतु मंत्रीमंडळं स्थापण्याला प्रतिकूल असे अनेक पक्षोपपक्ष निघून स. १९२०-२१ सालचं विराट भारतीय ऐक्य विभागलं. भारतीय जनतेची प्रचंड साम्राज्य-विरोधी आघाडी अशा रीतीनं विदीर्ण व विकीर्ण झाली.

स. १९२१ ते १९३० या नऊ-दहा वर्षांत गांधीजींच्या नेतृत्वाचं तेज किती तरी कमी झालं. पण स. १९३०-३२ च्या प्रचंड आन्दोलनामुळं गांधीजींना पुन्हां अग्रपूजेचा मान मिळूं लागला. आणि आतां तर (१९४२ च्या) ऑगस्ट-ठरावाचे आद्य प्रणेते

म्हणून गांधीजींचें महत्व केवळ राष्ट्रीय स्वरूपाचं राहिलें नसून, तें व्यापक व आंतरराष्ट्रीय ठरलं आहे!

गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा हा विलक्षण विकास कसा घडून आला व मध्यंतरींच्या काळांत गांधीविरोधी विचारप्रवाहांतून वहात वहात अखेरीस मी आज (गांधीवादाकडे नव्हे, पण गांधीजींच्या विशाल व्यक्तिमत्वामुळें व हिंदी जनतेच्या अनन्यसाधारण अशा क्रांतिप्रवण आविष्कारामुळें मी) गांधीजींना अनुकूल अशा नव्या वैचारिक भूमिकेकडे वळलों.

## विरोधी विचारप्रवाह : : ५

असहकाराचं अभूतपूर्व विराट आंदोलन स्वराज्यप्राप्तीच्या दृष्टीनं निष्फळ ठरल्यानंतर आपल्या देशांत गांधी-विरोधी प्रतिक्रिया जोरांत सुरू झाली. गांधीजी, गांधीजींचं तत्वज्ञान, गांधीजींची नैतिक मूल्यं–हें सर्व कांहीं एक अगडबंब थोतांड आहे, राजकारण व मानवी जीवनांतील वास्तवता यांच्याशी गांधीप्रणीत दृष्टिकोण विसंगत आहे, निदान ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जनविरोधी व मानवाविरोधी पाशवी शक्तीशी टक्कर देण्याच्या दृष्टीनं गांधीवादी ध्येय, धोरण, कार्यक्रम हें सर्व अगदी कुचकामी आहेत–अशा तऱ्हेचे विचार अनेकांच्या मनांत जोरानं उसळूं लागले. या अनेकांपैकींच मी एक होतों.—

पण, हे सर्व गांधी-विरोधी विचारप्रवाह वैफल्यातून उदयास आले होते. वैफल्याच्या वेदना किती भयानक स्वरूपाच्या असतात याचा पहिला कटु यातनामय अनुभव मला १९२१-२२ सालीं आला. त्यावेळीं मला काय वाटलं हें विस्तारानं सांगूं लागलों तर तोच एक ग्रंथ होईल. अगदी थोडक्यांत सांगायचं म्हणजे माझ्या सर्व अध्यात्मवादी भावनांचा आणि दुर्दम्य अशा आशावादी व

आत्मविश्वास अहंकाराचा त्यावेळीं अगदी चक्काचूर होऊन गेला. अध्यात्म, पुरातन भारतीय संस्कृतीचा अभिमान, स्वार्थत्याग, आत्मक्लेश, आत्मनिष्ठ सत्य-अहिंसा, अहंनिष्ठ असहकार व स्वयंनिष्ठ भावनावेग–ह्या सर्व गोष्टी मला अगदी अर्थशून्य वाटूं लागल्या. आपल्या पवित्र भावना दुखावल्या, विफल ठरल्या, अपमानित झाल्या म्हणजे अंतःकरण कसं पोखरून निघतं. याची जाणीव मला त्या काळांत चांगलीच झाली.

त्यावेळी मी एक संवेदनाशील, भावनाप्रधान असा युवक होतों. माझी बुद्धी परिपक्व झाली नव्हती. परस्परविरोधी घटकांनी परिपूर्ण अशा अगम्य समाजसंघर्षांचा सारासारविवेकबुद्धीनं विचार करण्याची शक्ति माझ्यांत त्यावेळीं आली नव्हती. पण असहकाराचं आवाहन देशांत दुमदुमूं लागतांच कांहीतरी उदात्त, परममंगल व दिव्य असं जें मानवी जीवनांत आहे तेंच आपल्याला हाक मारीत आहे, असं मला वाटलं. या हाकेला ओ देणं आपलं कर्तव्य आहे असं मला उत्कटतेनं वाटलं. तेजस्वी ज्योतीकडे पतंग अभावितपणें आकर्षिला जातो, तसाच असहकाराच्या वणव्याकडे मी आकर्षिला गेलों. ज्योतीच्या दाहक ज्वालेंत प्रवेश करतांच पतंग जळून भस्म झाला तर तो ज्योतीचा दोष कसा म्हणतां येईल?

असहकाराच्या वणव्यांत मी स्वयंप्रेरणेनं प्रवेश केला. पण पतंगाप्रमाणें मी पूर्णपणें जळून भस्म झालों नाही. माझ्या मनांतील कांही विचार, कित्येक भावना व थोड्याशा कल्पना मात्र पूर्णपणें भस्म होऊन गेल्या. एका अर्थानं मात्र माझं जुनं, पारंपरिक

व्यक्तित्व पूर्णपणें भस्म होऊन गेलं. पण मला आता त्याबद्दल यत्किंचित्‌हि वाईट वाटत नाही. उलट, नव्या व्यक्तित्वाची जाणीव मला करून दिल्याबद्दल गांधीजींना व असहकाराच्या आन्दोलनाला सदैव धन्यवाद द्यावेसे वाटतात. कारण, अग्निदिव्याचा असल अनुभव म्हणजे मानवी जीवनांतील अमोल अशी घटना आहे.—

पतंग ज्योतीकडे आकर्षिला जातो तो केवळ नैसर्गिक असहायतेमुळें; परंतु असहाकाराच्या वणव्याकडे मी जो आकर्षिला गेलो त्यांत असहायतेंपेक्षां स्वयंप्रेरणेचाच भाग अधिक होता. या स्वयं प्रेरणेचा उगम स्वत्वजागृतींत होता. असहकारितेचं आवाहन हें प्रत्येक स्वातंत्र्यप्रिय व्यक्तीला देण्यांत आलेलं एक आव्हान हें आव्हान स्वीकारा नाहीं तर स्वातंत्र्याच्या आस्मानीबाता बंद करा, अशा स्वरुपाचं हें आव्हान होतं. या आव्हानामुळें माझं सुप्त स्वत्व खडबडून जागृत झालं. स्वयंप्रेरणेनंच मी ह्या वणव्यांत उडी घेतली. गांधीजी हें एक अखंड आव्हान आहे.

**कबिरा खडा बजारमें लिये लुकाटी हाथ॥**
**जो घर फूंके अपना चले हमारे साथ"**

कबीराच्या या अर्थपूर्ण कवनांत म्हटल्याप्रमाणे गांधीजी हिंदवासियांनाच नव्हे तर, जगांतील सर्व मानवांना नित्य आव्हान देत आहेतः

'पेटलेलं लाकूड घेऊन मी जगाच्या बाजारांत उभा आहे. आपल्या घराला आग लावून द्यायची तयारी असेल त्यानंच माझ्या बरोबर यावं.'

गांधीजी हें या प्रकारचं एक जळजळतं आव्हान आहे. ज्यांनी १९२०-२१ सालीं हे आव्हान स्वीकारलं होतं त्याना, 'माझं घर जळालं, माझ्या संसाराची राखरांगोळी झाली' असा आक्रोश करण्याचा व गांधीजींनी देशाचं भयंकर नुकसान केलं, अशी ओरड करण्याचा कांहीएक अधिकार नाहीं. ज्यांना आपलीं घरंदारं, आपले बंगले व बागबगीचे प्रिय होते, ज्यांना आपल्या सुखी संसारांतच जीवनाचं सर्वस्व साठलं आहे. असं वाटत होतं, त्यांना गांधीजींनी बोलविलं नव्हतं. पण, ज्यांना आपल्या घरादारापेक्षा व सुखी संसारापेक्षा सामाजिक व राजकीय अन्याय नष्ट करून टाकण्याचं महत्व पटलं होतं त्यांनाच गांधीजींचं आव्हान होतं. स १९२०-२१ पासून तो आजतागायत पेटलेली मशाल घेऊन गांधीजी जगाच्या बाजारांत उभे आहेत. ही मशाल साम्राज्यशाही जाळण्यास अपुरी आहे असं ज्यांना वाटतं, त्यांनी अधिक प्रखर मशाल हातीं घेऊन खुशाल त्यांच्या पुढे जावं. गांधीजींचं आव्हान निष्प्रभ करून टाकण्याचा हाच एक खरा तेजस्वी मार्ग आहे.

असहकाराचं आन्दोलन अपेशी झाल्यानंतर मी, मी म्हणविणारे अनेक रथीमहारथी स्वातंत्र्याचा सन्मार्ग जनतेला दाखविण्यासाठीं पुढे सरसावले. त्या पैकी देशबंधु चित्तरंजन दास व पं. मोतीलाल नेहरू हे दोघे विशेष प्रभावी होते. गांधीजी व बहुसंख्य कॉंग्रेसजन कायदेमंडळांत जाण्याविरुद्ध होते. पूर्ण असहकारासाठी व सामुदायिक सविनय प्रतिकारासाठी जनतेला तयार करणं, हेंच आपलं कर्तव्य आहे असं गांधीजींचं व नाफेरवाल्यांचं मतं होतं. उलट कायदेमंडळात

जाऊन सरकारला अखंड विरोध करीत राहाणं, हाच मार्ग आपल्याला अधिक अल्पकाळांत स्वराज्याप्रत नेईल अशी दास नेहरू यांची भूमिका होती.

या भूमिकेच्या चिंधड्या उडविण्यांत ज्यांची अति कुशाग्र बुद्धि पहिल्याप्रथम कॉंग्रेसमध्ये प्रखर तेजानं तळपली ते म्हणजे आजचे कायदेमंडळवादी श्री. राजगोपालाचारी ! राजाजींनी राजकीय बुद्धिवादी भूमिकेवरून दास-नेहरूंच्या मतांच्या अक्षरशः चिंधड्या उडविल्या. गांधीजी केवळ अध्यात्मवादी नाहीत, त्यांना राजकारणहि चांगलं कळतं, स्वातंत्र्य मिळण्याचा संभव असेल तर त्यांच्याच मार्गानं तें अधिक लवकर प्राप्त होईल; कायदेमंडळाचा मार्ग हा पुचाट व शरणागतीचा होय; तो केवळ एक शाब्दिक बुद्धिचापल्याचा पोरकट खेळ आहे; जनतेला स्वावलंबी, सुजाण व प्रतिकारक्षम बनविणें हाच स्वातंत्र्याचा खरा मार्ग आहे, पण तो कष्टाचा आहे, त्यागाचा आहे; केवळ बुद्धिवाद्यांना हा मार्ग झेपण्यासारखा नाही, म्हणून कायदेमंडळाच्या स्वप्नरंजनांत गुंगत रहाणं त्यांना अधिक पसंत पडतं; वाटल्यास कायमेडंळांत जा, पण तो स्वराज्यसाधनाचा व लोकसत्तेचा मार्ग आहे असा भ्रम मात्र जनतेंत निर्माण करूं नका,'– अशा युक्तिवादानं गाधीजींच्या मार्गाचं समर्थन राजाजींनी त्यावेळीं फारच प्रभावी शब्दांत केलं. आपलं त्यावेळचं सारं भाषण राजाजी आठवतील तर त्यांना आज काय वाटेल कुणास ठाऊक ! पण राजकारणात आठवणीला फारसं महत्व नसतं म्हणतात, तेंच राजर्जीना आतां कदाचित् पटूं लागलं असेल ! मात्र कसल्याहि प्रकारच्या

विस्मृति-विलासाला यत्किंचित्‌हि स्थान गांधीजींच्या मार्गात नाही याचा राजाजींना विसर पडावा हें एक मानसशास्त्रीय नवल आहे!—असो.

दास-नेहरूंना कॉंग्रेसमध्ये बहुमत मिळूं शकलं नाही. तरी पण, गांधीजींनी स्वराज्यपक्ष स्थापनेला अनुमति दिली व अनुयायांना चरखा, खादी, ग्रामोद्योग, अस्पृश्यतानिवारण, हिंदु मुस्लीम ऐक्य अशा विधायक कार्यक्रमाकडे शक्ति केंद्रित करण्याचा आदेश दिला. कायदेमंडळांचा प्रयोग निष्फल ठरेल याची गांधीजींना पूर्ण जाणीव होती. तरीपण दासनेहरू यांच्यासारख्या महनीय सहकाऱ्यांचं प्रामाणिक मत केवळ बहुमताच्या जोरावर दडपून टाकणं योग्य नाही, असं वाटल्यामुळं स्वराज्यपक्ष स्थापनेला कॉंग्रेसनं विरोध करूं नये, असं मत गांधीजींनी प्रदर्शित केलं. आणि कॉंग्रेसनं अखेरीस त्या मताचा पाठपुरावा केला.

महाराष्ट्रांत श्री. न. चि. केळकर व लो. ना. अणे यांनी लोकमान्यांच्या नांवावर निराळा सूर काढला. स्वराज्यपक्षाच्या धोरणालाहि या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी विरोध केला. कायदेमंडळांत तर जायचं पण बहुमत मिळालं असतांहि मंत्रिमंडळं स्थापन करावयाचीं नाहीत, ही भूमिका तर्कदुष्ट व अर्थशून्य आहे. असं या पुढाऱ्यांचं मत होतं. या मतानुसार महाराष्ट्रांत प्रतिसहकारपक्ष स्थापन झाला. स्वराजिस्ट व प्रतिसहकारवादी यांच्यांत निवडणुकीच्या वेळीं चांगलीच झुंबड माजली. तिचें शोचनीय पर्यवसान म्हणजे

तांबे * प्रकरण होय. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय लौकिकाला कलंक लागला, तो अद्यापपावेतों नीटसा धुवून निघाला नाही. उलट, डॉ. राघवेंद्रराव व डॉ. खरे यांनी मध्यप्रांतीय राजकारणांत जे रंग उधळल्याने तांबेप्रकरणाला ऐतिहासिक परंपरेचं स्वरूप आलं, यामुळें लोकमान्यांच्या वेळीं भारतीय राजकारणाच्या अग्रेसर आघाडीवर असलेला महाराष्ट्र हा गेल्या ऑगस्ट-आन्दोलनापावेतों एक दुय्यम दर्जाचा राजकीय दुवा होऊन बसला होता. महाराष्ट्रांतील बहुजन-समाजानं कॉंग्रेसची कास कधीच सोडली नाही; पण महाराष्ट्राच्या 'महनीय' पुढाऱ्यांनी मात्र जनतेचा बुद्धिभ्रंश करून येथील साम्राज्यविरोधी आघाडी कुमकुवत करण्याकडे आपलं सारं बुद्धि-वैभव खर्ची घातलं.

पण सन १९३०-३२ सालच्या आंदोलनांत व विशेषतः गेल्या ऑगस्ट आंदोलनांत महाराष्ट्रानं व मध्यप्रांत-वऱ्हाडनं जें तेज प्रकट केलं, त्याची प्रभा आज ना उद्या भारतीय राजकारणावर पडल्याशिवाय खास राहणार नाही. ऑगस्ट आंदोलन कोणाला कितीहि दोषार्ह वाटो, पण या आंदोलनानं महाराष्ट्रांतील सारीं जुनीं जळमटं एकदां कायमची जाळून खाक करून टाकलीं. हा जो उपकार या आंदोलनानं महाराष्ट्रावर करून ठेवला आहे तो आमच्या इतिहासांत अविस्मरणीय असा घणला जाईल!

* **टीपः**—तांबे प्रकरण: श्रीपाद बलवंत तांबे हे स्वराज्य-पक्षाची शिस्त मोडून मध्यप्रांतांत गृहमंत्रि झाले (स. १९२५) व त्यामुळें स्वराज्यपक्षांत फूट पडली.

गांधी-विरोधी विचारप्रवाहांचे आरंभीचे दोन मुख्य आविष्कार म्हणजे स्वराज्यपक्ष व प्रतिसहकारपक्ष होत. त्यांची काय गत झाली व स्वराज्यसाधनाच्या दृष्टीनं अथवा जनतेची साम्राज्य विरोधी प्रतिकार शक्ति वाढविण्याच्या दृष्टीनं या दोन्ही आविष्कारांनी काय पराक्रम गाजविले हे सर्वश्रुत आहे.

गांधी-विरोधी विचारप्रवाहाचा राहतां राहिला एकच प्रभावी आविष्कार. तो म्हणजे मार्क्सवादी व साम्यवादी चळवळ. ह्या चळवळीना देशांत महत्वाचं स्थान प्राप्त झालं नाही. इतकेंच नव्हे तर मार्क्सप्रणीत साम्यवादावरदेखील गांधीजींनीच मात केली हा इतिहास आता अभ्यासायचा आहे.

## वैचारिक गोंधळ : : ६

असहकारी आन्दोलनातून बाहेर पडल्यानंतर माझी मनोवृत्ति आत्यंतिक गांधी-विरोधी बनली. ज्या वैयक्तिक व सामाजिक जीवनमूल्यांचं एक तेजस्वी प्रतीक म्हणून गांधीजी असंख्य भारतीयांच्या मनश्चक्षूंसमोर १९२०–२१ साली चमकले, तीं जीवनमूल्यं मला अवास्तव व म्हणूनच अर्थशून्य वाटूं लागलीं.

परंतु, गांधीविरोध म्हणजे येरागबाळाचं काम नव्हे, याची मला त्यावेळीच पूर्ण जाणीव होऊन चुकली होती. गांधीजींचा मार्ग व त्यांचीं जीवनमूल्यं चूक, तर मग दुसरा मार्ग व दुसरीं जीवनमूल्यं कोणतीं? या प्रश्नाचं उत्तर देणं ही त्यावेळी माझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट होती. हेंच माझ्या आंतरिक दुःखाचं व यातनामय अस्वस्थतेचं मुख्य कारण होतं. चूक काय हें स्पष्टपणे कळणं, पण बरोबर काय याची मात्र अस्पष्टदेखील कल्पना न येणं ही अवस्था किती यातनामय होते याची जाणीव, आपणांस कांहीतरी कळावं असं अल्प काळ कां होईना, पण अत्युत्कटपणें वाटलं, त्यांनाच थोडीबहुत येऊं शकेल. इतरांना ही सर्व भानगड अगदी अर्थशून्य व कदाचित् [illegible] वाटेल.

असहकारी चळवळ प्रत्यक्ष साध्याच्या दृष्टीनं विफल ठरल्यानंतर ज्या गांधी-विरोधी प्रतिक्रिया निर्माण झाल्या, त्यापैकी एकीचाहि माझ्या मनावर विशेष परिणाम झाला नाही. स्वराज्यपक्ष अथवा प्रति-सहकारपक्ष यांचं राजकारण तर वैफल्यात्मक मनोवृत्तींतून उदयास आलेलं. साम्राज्यविरोधी व स्वातंत्र्यसंपादनाच्या निकषावर खुद्द गांधीजींची किंवा त्यांच्या असहकार व सत्याग्रह या तत्वाची कसोटी पहाण्याचें सामर्थ्य त्यावेळच्या कुठल्याहि गांधी-विरोधी विचार-प्रवाहांत नव्हतं. स्वातंत्र्यसंपादनासाठीं अथवा सर्वार्थसाधनासाठी असंख्य व्यक्तींना रूढ जीवनप्रकाराचा त्याग स्वयंप्रेरणेनं करावयास भाग पाडूं शकेल, अशी कोणतीहि वैचारिक भूमिका स. १९२१-२२ ते स. १९३०-३२ पर्यंतच्या काळांत मला आढळली नाही.

अपेशी ठरलेल्या असहकारी आन्दोलनांतून बाहेर पडलेल्या अनेक तरुणाप्रमाणे मीहि व्यक्तिजीवनाच्या संकुचित अवगुंठनांत कांहीं काळ अडकून राहिलों. व्यक्तिजीवन हीच खरी चिरंतन वास्तवता व सामुदायिक आन्दोलन हा केवळ एक क्षणभंगुर आभास, असं मला वाटूं लागलं. ते आन्दोलन वैफल्याच्या वैराण वाळवंटांत विराम पावूं लागतांच असहकाराच्या सामुदायिक आन्दोलनाकडे वेगानं ओढली गेलेली माझी जीवशक्ति एकदम थबली व मागे परतूं लागली. त्या आन्दोलनाच्या वैचारिक आवाहनांतून जे स्वातंत्र्यपूर्ण असं नवं, चैतन्यमय, अधिक उदात्त व अधिक प्रगति-शील समाजजीवन माझ्या मनश्चक्षूंसमोर तरंगूं लागलं होतं व ज्या नवजीवनासाठी रूढ, स्थितिप्रधान व परतंत्र जीवनाचा त्याग

करण्यास मी स्वयंप्रेरणेनं तयार झालों होतों, तें नवजीवन म्हणजे केवळ एक आभास आहे असं दिसून येतांच, असहकारी सामुदायिक आन्दोलनाचं आवाहन मला अर्थशून्य वाटूं लागलं. यामुळें सामुदायिक आन्दोलनाकडे वेगानं ओढली गेलेली माझी जीवशक्ति केवळ व्यक्तिजीवनावर, व्यक्तिजीवनांत अंतर्भूत असलेल्या वास्तवतेच्या व वास्तवताप्रधान जीवनमूल्यांच्या शोधावरच पूर्णपणें केंद्रित होऊं लागली.

या शोधांतून मला प्रतीत झालेल्या कांही जीवनमूल्यांचा आविष्कार म्हणजेच माझ्या कादंबऱ्या होत. माझ्या बाबतींत कादंबरीलेखन हा केवळ एक आत्मप्रकटीकरणाचा प्रकार होय. जीवनसंघर्षजन्य आत्मप्रकटीकरण, स्वनुभावात्मक जीवनाचा स्पर्श न सोडतां केलेलं आत्मप्रकटीकरण म्हणजेच कला, अशी कलेची व्याख्या मी करीत असतों, त्याचं कारण असं आहे. कलानिर्मिति हा एक जगण्याचा, अधिकाधिक सुजाणपणें जगण्याचा एक प्रकार होय, असं मला वाटतं. कला आणि जीवन यांचा अन्योन्य संबंध माझ्या दृष्टीनं अशा प्रकारचा आहे.

असहकाराच्या आन्दोलनांतून व्यक्त झालेलीं गांधीजींचीं जीवनमूल्यं मला चुकीचीं वाटूं लागलीं तरी, साम्राज्यविरोधी सामुदायिक आन्दोलनांतील जीवनमूल्यं व दैनंदिन व्यक्तिजीवनांतील संघर्षांतून प्रतीत होणारीं जीवनमूल्यं यांच्यांत कमलाहि मूलभूत फरक नाही, अशी जी माझी समजूत स.१९२०–२१ ते स.१९३०–३२ या कालावधीत झाली ती मात्र अद्यापपावेतों कायम आहे.

माझ्या राजकीय मतांत अनेक परिर्तनं झाली व पुढेहि कदाचित् होतील. पण, माझ्या या जीवनमूल्याविषयक मतांत त्यामुळे कांही बदल घडून येईल असं मुळीच वाटत नाही.

जीवनमूल्यं हा सर्वस्वी आत्मप्रत्ययाचाच भाग होय. राजकारण हा या जीवनमूल्यांपैकी काहींचा एक केवळ प्रासंगिक आविष्कार होय. हें विधान माझ्या बाबतीत जितकं खरं आहे, तितकंच ते गांधीजीच्याहि बाबतींत खरं आहे, असं मला वाटतं. गांधीजी हे विशिष्ट जीवनमूल्यांकरतांच प्राण पणाला लावून झगडत आहेत. त्यांच्या बाबतींत राजकारण हा केवळ त्यांच्या व्यक्तिजीवनांतून त्यांना प्रतीत झालेल्या जीवनमूल्यांचा एक आविष्कार होय.

गांधीजींचीं जीवनमूल्यं व माझी जीवनमूल्यं एकसारखींच आहेत, असं मला मुळींच म्हणावयाचं नाहीं. उलट, काहीं बाबतीत गांधीजींचीं जीवनमूल्यं व मला प्रतीत झालेली जीवनमूल्यं यांच्यांत बराच फरक आहे. गांधीजींना आपलीं जीवनमूल्यं जितकीं प्रिय व महत्वाचीं वाटतात. तितकींच मलाहि माझीं जीवनमूल्यं प्रिय व महत्वाचीं वाटतात. जीवनमूल्यांच्या बाबतीत कोणत्याहि थोर व्यक्तीला अथवा विभूतीला 'गुरु' मानण्याची माझी मुळींच तयारी नाही. कारण, स्वानुभवात्मक जीवन हाच आत्मप्रत्ययात्मक जीवन-मूल्यांचा एकमेव आधार असूं शकतो, अशी माझी ठाम समजूत आहे. फरक एवढाच की, गांधीजी हे एक असामान्य असे महापुरुष आहेत. मी एक सामान्य असा पामर आहे. बहुजनसमाजावर प्रभाव पाडण्याइतकं सामर्थ्य माझ्या जीवनमूल्यांना प्राप्त झालेलं

करण्यास मी स्वयंप्रेरणेनं तयार झालों होतों, ते नवजीवन म्हणजे केवळ एक आभास आहे असं दिसून येतांच, असहकारी सामुदायिक आन्दोलनाचं आवाहन मला अर्थशून्य वाटूं लागलं. यामुळे सामुदायिक आन्दोलनाकडे वेगानं ओढली गेलेली माझी जीवशक्ति केवळ व्यक्तिजीवनावर, व्यक्तिजीवनांत अंतर्भूत असलेल्या वास्तवतेच्या व वास्तवताप्रधान जीवनमूल्यांच्या शोधावरच पूर्णपणें केंद्रित होऊं लागली.

या शोधांतून मला प्रतीत झालेल्या कांही जीवनमूल्यांचा आविष्कार म्हणजेच माझ्या कादंबऱ्या होत. माझ्या बाबतींत कादंबरीलेखन हा केवळ एक आत्मप्रकटीकरणाचा प्रकार होय. जीवनसंघर्षजन्य आत्मप्रकटीकरण, स्वनुभावात्मक जीवनाचा स्पर्श न सोडतां केलेलं आत्मप्रकटीकरण म्हणजेच कला, अशी कलेची व्याख्या मी करीत असतों, त्याचं कारण असं आहे. कलानिर्मिति हा एक जगण्याचा, अधिकाधिक सुजाणपणें जगण्याचा एक प्रकार होय, असं मला वाटतं. कला आणि जीवन यांचा अन्योन्य संबंध माझ्या दृष्टीनं अशा प्रकारचा आहे.

असहकाराच्या आन्दोलनांतून व्यक्त झालेली गांधीजींची जीवनमूल्यं मला चुकीचीं वाटूं लागलीं तरी, साम्राज्यविरोधी सामुदायिक आन्दोलनांतील जीवनमूल्यं व दैनंदिन व्यक्तिजीवनांतील संघर्षांतून प्रतीत होणारीं जीवनमूल्यं यांच्यांत कमलाहि मूलभूत फरक नाही, अशी जी माझी समजूत स.१९२०–२१ ते स.१९३०–३२ या कालावधींत झाली ती मात्र अद्यापपावेतों कायम आहे.

माझ्या राजकीय मतांत अनेक परिवर्तनं झाली व पुढेहि कदाचित् होतील. पण, माझ्या या जीवनमूल्यविषयक मतांत त्यामुळे कांही बदल घडून येईल असं मुळीच वाटत नाही.

जीवनमूल्यं हा सर्वस्वी आत्मप्रत्ययाचाच भाग होय. राजकारण हा या जीवनमूल्यांपैकीं कांहींचा एक केवळ प्रासंगिक आविष्कार होय. हें विधान माझ्या बाबतीत जितकं खरं आहे, तितकंच तें गांधीजींच्याहि बाबतींत खरं आहे, असं मला वाटतं. गांधीजी हे विशिष्ट जीवनमूल्यांकरतांच प्राण पणाला लावून झगडत आहेत. त्यांच्या बाबतींत राजकारण हा केवळ त्यांच्या व्यक्तिजीवनांतून त्यांना प्रतीत झालेल्या जीवनमूल्यांचा एक आविष्कार होय.

गांधीजींचीं जीवनमूल्यं व माझी जीवनमूल्यं एकसारखीच आहेत, असं मला मुळीच म्हणावयाचं नाहीं. उलट, कांही बाबतीत गांधीजींची जीवनमूल्यं व मला प्रतीत झालेली जीवनमूल्यं यांच्यांत बराच फरक आहे. गांधीजींना आपली जीवनमूल्यं जितकीं प्रिय व महत्वाचीं वाटतात. तितकींच मलाहि माझीं जीवनमूल्यं प्रिय व महत्वाचीं वाटतात. जीवनमूल्यांच्या बाबतींत कोणत्याहि थोर व्यक्तीला अथवा विभूतीला 'गुरु' मानण्याची माझी मुळीच तयारी नाही. कारण, स्वानुभवात्मक जीवन हाच आत्मप्रत्ययात्मक जीवनमूल्यांचा एकमेव आधार असूं शकतो, अशी माझी ठाम समजूत आहे. फरक एवढाच की, गांधीजी हे एक असामान्य असे महापुरुष आहेत. मी एक सामान्य असा पामर आहे. बहुजनसमाजावर प्रभाव पाडण्याइतकं सामर्थ्य माझ्या जीवनमूल्यांना प्राप्त झालेलं

नाहीं. कारण, त्यासाठी महत्त्वाकांक्षेची जी आग अंतःकरणांत नित्य धगधगावी लागते ती माझ्याजवळ जवळ जवळ नाहीच असं मला वाटतं. बाह्य परिस्थितीमुळे आवश्यक व अपरिहार्य होतं तेवढ्यापुरता समाजजीवनांत संचार करणं मला क्रमप्राप्त होतं. या दृष्टीनं राजकारण हा माझ्या स्वभावधर्माचा एक गौण भाग आहे असो.

चालू महायुद्धाच्या भयानक वैचारिक गोंधळाच्या काळांत ' आगस्ट ठरावाच्या ' रूपानं सुस्पष्ट व निश्चयात्मक भूमिका गांधीजींनी घेतली व हिंदी जनतेनं स्वयंस्फूर्तीनं तिला पाठिंबा दिला, तो पाहून गांधीजींच्या व्यक्तिमत्वाबद्दल मला पुन्हां आत्यंतिक आदर वाटूं लागला, हें मी प्रांजलपणें कबूल करतों. एवढंच नव्हे, तर गांधीजींचा असहकार, चरखा, खादी, ग्रामोद्योग, सविनय कायदेभंग व सत्याग्रह, इत्यादि कार्यक्रमाकडं पहाण्याच्या माझ्या पूर्वीच्या दृष्टिकोणांत आता आमूलाग्र बदल घडून आलेला आहे, हेंहि मी कबूल करतों. पण ही नवी जाणीव होण्यापूर्वी, मी साम्यवादाकडे कसा वळलों व साम्यवादी चळवळीशी सुमारें दहा वर्षे समरस झाल्यानंतर, ऑगस्ट आंदोलनाच्या प्रभावामुळें स्टॅलिन-प्रणीत साम्यवादाची भयानक, सांप्रदायिक अमानुषता कशी स्पष्ट झाली हें थोडक्यांत सांगणें जरूर आहे.

असहकाराच्या वैफल्यानंतर सुमारें दहा वर्षं माझ्या जीवनाला आत्यंतिक व्यक्तित्ववादाचं स्वरूप प्राप्त झालं. या काळांत व्यक्ति-स्वातंत्र्य हेंच एक जीवनमूल्य इतर सर्व जीवनमूल्यांहून मला अधिक महत्वाचं वाटूं लागलं. अद्यापहि या जीवनमूल्यांवरील माझी श्रद्धा यत्किंचितहि कमी झाली नाहीं. व्यक्ति-स्वातंत्र्याच्या पूर्ण आधारावर

समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे; व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूलाधारावर व्यक्तिविकास घडून येणं शक्य आहे, आणि व्यक्तिविकास हाच सामाजिक प्रगतीचा एकमेव निकष आहे; म्हणून राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याची उभारणी व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रमेयावर झाली पाहिजे; व्यक्तिस्वातंत्र्याला दुर्लक्षिणारीं सर्व प्रमेयं, मग तीं कोणत्याहि स्वरूपाची असोत, तीं सर्व आवास्तव अतएव थोतांडी समजावीं. व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास हीच अंतिम वास्तवता; या वास्तवतेला दुर्लक्षिणारी व महत्वशून्य करून टाकणारी इतर सर्व प्रमेयें अवास्तव, अतएव त्याज्य—अशी माझ्या जीवनविषयक दृष्टिकोणाची वैचारिक भूमिका स्वानुभवांच्या आधारावर आकारास आली.

या वैचारिक भूमिकेच्या प्रसारासाठी वैयक्तिक आचरण व लेखन यापलीकडे आपल्याला कांही करता येण्यासारखं आहे व तें आपण केलं पाहिजे, याची मला जाणीव होऊं शकली नाही. पण स. १९३१ साली माझ्या खासगी जीवनांत अशी एक घटना घडली. त्या धक्क्यामुळे सारी जीवनशक्ति एकवटून मी पुन्हां राजकीय आन्दोलनांत प्रवेश केला. राजकीय स्वातंत्र्याचं भारतीय आन्दोलन आणि व्यक्तिस्वातंत्र्याचें जीवनमूल्य यांच्या सजीव एकरूपतेची मला साक्ष पटली.

स. १९३१ च्या ऑक्टोबरांत मी 'विदर्भ युवक संघा'चा अध्यक्ष झालों. या संघामार्फत वऱ्हाडांतील शेतकऱ्यांच्या सारामाफीच्या चळवळीसाठी मीं जीवाची आटापीट केली. विदर्भ प्रांतिक कॉंग्रेसचे

अध्यक्ष वीर वामनराव जोशी यांनी या चळवळीला कॉंग्रेसची सहानुभूति मिळवून दिली. कॉंग्रेस म्हणजे धार्मिक, नैतिक व आध्यात्मिक स्वरूपाचा गांधीवाद नव्हे; कॉंग्रेस म्हणजे हिंदी जनतेच्या जीवनविषयक आकांक्षांना संघटित रीतीनं व्यक्त स्वरूप देणारं असं एक व्यापक बलाढ्य सामुदायिक आन्दोलन आहे, याची जाणीव मला त्यांच्या साहचर्यामुळें व सक्रिय सहानुभूतीमुळे झाली. त्यांच्याच आग्रहामुळे, माझा गांधीवादाशीं तीव्र मतभेद असतांहि मी प्रांतिक कॉंग्रेस समितीचा सभासद झालों आणि स. १९३२ चं सामुदायिक आन्दोलन सुरू होतं न होतं तोंच सरकारनं राजद्रोहाच्या आरोपावरून माझी तुरुंगांत रवानगी केली.

•

माझ्या व्यक्तिजीवनांत नवा सामाजिक आशय ओतण्याच्या दृष्टीनं हा अनुभव क्रांतिकारक ठरला, असं मला वाटतं. कॉंग्रेसविषयी अत्यंत आपुलकीचा भाव, पण गांधीजी व गांधीवाद याविषयी तीव्र मतभेद, असं माझ्या त्यावेळच्या वैचारिक संघर्षाचं स्वरूप होतं. कॉंग्रेसवर अनन्यसाधारण श्रद्धा ठेवणाऱ्या असंख्य सामान्य लोकांना गांधीवादापेक्षा कॉंग्रेसचं साम्राज्यविरोधी स्वरूप व प्रत्यक्ष प्रतिकारात्मक असं साम्राज्यविरोधी आन्दोलन, यांचंच अधिक महत्व वाटत होतं, हें मला दिसून आलं. तुरुंगांत असतांना माझा हा समज अधिक दृढ झाला. कॉंग्रेसच्या साम्राज्यविरोधी स्वरूपाला अधिक प्रखरता प्राप्त झाली पाहिजे आणि गांधीवादाच्या मगरमिठींतून कॉंग्रेसची सुटका झाल्याशिवाय ही प्रखरता प्राप्त होणं शक्य नाही, असं मला उत्कटतेनं वाटूं लागलं. गांधीजींचे अनेक

नामवंत अनुयायी गांधीवादी तंत्राचा दुरुपयोग आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी व वैयक्तिक महत्वाकांक्षेसाठी कसा करतात व यामुळें अस्सल साम्राज्यविरोधी वृत्तीची व कर्तृत्वाची गळचेप कशी होते, याचा अनुभव मला बराच मिळाल्यामुळं, गांधीजींविषयी अत्यंत आदर आदर वाटत असतांहि, गांधीवादाविषयी माझ्या मनांत तीव्र विरोधाची भावना निर्माण झाली.

अशा मन:स्थितींत, साम्यवादी वाङ्मय माझ्या वाचनांत आलं. तावडतोब जें हवं होतं तेंच आपल्याला गवसलं, असं मला वाटलं. मार्क्स, लेनिन, व ट्रॉट्स्की यांच्या ग्रंथानी माझं मन पूर्ण भारून टाकलं. सारी चिकित्सक वृत्ती बाजूला सारून मी मार्क्सवादाशी पूर्ण समरस होऊं लागलों. एकाएकी प्रेमांत पडलेला उन्मादक वृत्तीचा तरुण आपल्या प्रीतिभावनेशी जसा बेफामपणें तन्मय होऊन जातो तशीच कांहीशी गत माझी झाली !

मार्क्सवादांत इतक्या अनिर्बंध रीतीनं मी वाहवत गेलों, याचीं मुख्यत: दोन कारणं होतीं. (१) सामुदायिक आन्दोलनांच्या अनुभवामुळे साम्राज्यशाहीचा द्वेष माझ्या रोमरोमीं भिनला, साम्राज्यशाही नष्ट झाल्याशिवाय कोणत्याहि जीवनमूल्याचा विकास घडून येणं शक्य नाही अशी माझी ठाम समजूत झाली; गांधीवादी तंत्र हें पुरेसं साम्राज्यविरोधी नाही असा, गांधीजींच्या नामवंत पण नादान अनुयायांच्या कारवायांमुळे, माझा समज, अथवा गैरसमज दृढमूल होऊन बसला; कॉंग्रेसला कट्टर साम्राज्यविरोधी स्वरूप येण्यासाठी साम्राज्यवादाबरोबरच गांधीवादालाहि विरोध करणं अपरि-

हार्य आहे, अशी माझी खात्री झाली. मार्क्सवाद अथवा कम्युनिझम् हें कट्टर साम्राज्यविरोधाचं प्रभावी शस्त्र आहे, अशी माझी समजूत झाली.

दुसरं कारण असं :–राजकारण हें मला प्रथम दर्जाचं असं कधीच वाटलं नाहीं, आजहि वाटत नाही. आतरिक जीवनमूल्यांना आद्य स्थान देण्याकडे माझ्या प्रवृत्तीचा प्रारंभापासूनच स्वाभाविक कल आहे. पण याहि दृष्टीनं मार्क्सवाद हा आपल्या व्यक्ति जीवन–मूल्यांशी पूर्ण सुसंगत आहे, अशीहि माझी समजूत झाली. ( सामुदायिक ) ‘ व्यक्तिमात्राच्या स्वातंत्र्याखेरीज सामुदायिक स्वातंत्र्य मिळत नाही ’ अशा स्वरूपाचीं मार्क्सची विधानं माझ्या स्वानुभवनिष्ठ जीवन–मूल्याशीं सुसंगत होती, यामुळें व्यक्तिस्वातंत्र्य–प्रधान अशा आपल्या आंतरिक जीवनमूल्याना जागतिक महत्व देण्याचं एक प्रभावी व प्रतिभाशाली साधन म्हणजेच मार्क्सवाद, अशी समजूत झाली, ती वावगी नव्हती. मार्क्सवादाच्या विचार-प्रणालीत अनिर्बंधपणे वाहून जाण्याला माझ्या बाबतीत व्यक्तिशः हें दुसरं कारण अधिक प्रभावी ठरलं.

एक गोष्ट मात्र माझ्या बाबतींत विशेष महत्त्वाची होती. साम्यवादापासून मला परावृत्त करण्याच्या कामीं माझी कॉंग्रेसवरील व जनतेवरील अढळ श्रद्धाच उपयोगी पडली. म्हणजे कॉंग्रेस-वरील व जनतेच्या क्रांतिकारक कर्तृत्वशक्तीवरील माझी अढळ श्रद्धा. मार्क्सवादांत ती उन्मादकपणें वाहवत गेली तरी देखील माझी ही श्रद्धा यत्किंचितहि ढळली नाहीं. उलट मार्क्सवादाच्या

वैचारिक प्रभावामुळें माझ्या या श्रद्धेला अधिक स्थैर्य व अधिक वस्तुनिष्ठ जोम प्राप्त झाला. पण आश्चर्य हें कीं या श्रद्धेमुळें कम्युनिस्टपक्षाचा सभासद होण्याऐवजी मी कॉंग्रेस समाजवादी पक्षाचा सभासद झालों. आणि तीन चार वर्षांनंतर हा पक्ष सोडून कम्युनिष्टांशीं मी अधिक सहकार्य करूं लागलों. तरी देखील कम्युनिस्ट पक्षाचा रीतसर सभासद होण्याची मला कधीच इच्छा झाली नाहीं. मार्क्सवादाच्या प्रभावामुळें मी कम्युनिस्टांसाठीं पुष्कळ खस्ता खाल्ल्या. माझं होतं नव्हतं तेवढं बळ, माझी होती नव्हती तेवढी धनदौलत मी कम्युनिस्टांच्या चळवळीवर उधळून दिली. पण हें सर्व, कॉंग्रेसला अधिक साम्राज्यविरोधी स्वरूप प्राप्त व्हावं, या एकमात्र बुद्धीनं केलं. म्हणून कम्युनिस्टासाठी जें कांहीं मी केलं त्याबद्दल मला मुळीच पश्चात्ताप वाटत नाहीं. कारण हिंदी कम्युनिस्ट स. १९३५ पासून तों स. १९४१ च्या डिसेंबरपर्यंत कट्टर साम्राज्यविरोधी होते व त्याचं सारं कर्तृत्व या काळांत कामगार, किसान, व विद्यार्थी यांनी कट्टर साम्राज्यविरोधी वृत्ती बनविण्याकडे खर्ची पडत होतं.

पण अखेरीस ऑगस्ट–आंदोलनाच्या ऐन आणीबाणीच्या वेळीं कम्युनिस्टांनी कॉंग्रेसची व हिंदी जनतेची साथ सोडून दिली. मार्क्सप्रणीत साम्यवादाला निर्बुद्ध व अंधश्रद्ध स्वरूप प्राप्त होतांच सुबुद्ध व कर्तबगार माणसं देखील किती देशद्रोही व स्वजनद्रोही होऊ शकतात याची मला अत्यंत भयानक रीतीने साक्ष पटली. कम्युनिस्टांना ब्रिटिश साम्राज्यशाहीचे गुलाबी हस्तक होणारे लोक आज 'देशभक्त व पुरोगामी' वाटू लागले आहेत. प्राण पणाला

लावून ब्रिटिश साम्राज्यशाहीला विरोध करणारे हिंदी पुढारी व हिंदी जनता ह्यांना ते आता 'देशद्रोही' व 'पंचदळी' म्हणतात! विरोध-विकासी थोतांडाच्या त्रांगड्यांत अडकलेल्या मार्क्सप्रणीत साम्य-वादाचं रूपांतर अत्यंत अमानुष अशा दैवदुर्विलासात घडून आलं आहे!!

कट्टर साम्राज्यविरोधी व नवीं जीवनमूल्यं यांच्या कल्पित संगतीवर निष्ठा ठेवूनच मी मार्क्सवादी विचारप्रणालीत वाहवत गेलों. ही सजीव संगति स्टॅलिनाधिष्ठित सोव्हिएट रशियानं व स्टॅलिन या व्यक्तीचे सर्वस्वी गुलाम बनलेल्या कम्युनिस्टांनी छिन्न-विच्छिन्न करून टाकतांच, सांप्रदायिक मार्क्सवादाच्या मोह-जालांतून माझी सुटका झाली. सोव्हिएट रशियापेक्षा, सुबुद्ध, धूर्त, पण ध्येयशून्य स्टॅलिनपेक्षा आणि निर्बुद्ध व नादान कम्युनिस्टापेक्षा गांधीजींनी, कॉंग्रेसनं व बहुसंख्य हिंदी जनतेनं कितीतरी उदात्त वैचारिक व नैतिक भूमिकेवरून ऑगस्ट ठरावाच्या व ऑगस्ट-आंदोलनाच्या रूपानं कट्टर साम्राज्यविरोध प्रकट केला आहे. गांधीजी, कॉंग्रेस व हिंदी जनता यांच्या या साम्राज्यविरोधी अवि-ष्काराला आता जागतिक महत्व प्राप्त झालं आहे. मानवी जगाच्या पुरोगामी भवितव्याची हीच आता एकमात्र पताका झालेली आहे. जगांतील इतर सर्व वाद व संप्रदाय या ना त्या आसुरी प्रतिगामी शक्तींचे नादान हस्तक बनलेले आहेत.

ही अस्सल पुरोगामी व नव्या मानवी जीवनमूल्यांची स्फूर्ति-निधान होऊं शकणारी अशी धीरोदात्त भूमिका, महायुद्धाच्या

भीषण वणव्यांत सारं जग पोळून निघत असतांनादेखील स्थितप्रज्ञाच्या अविचल निष्ठेनं गांधीजींनाच तेवढी का घेतां आली याची चर्चा अतःपर करावयाची आहे.

## जागतिक संघर्षाचे प्रणेते : : ७

स्वातंत्र्य व संस्कृतिविरोधी जागतिक झोटिंगशाही (फाशीवाद ? नात्सीवाद ) विरुद्ध स्वातंत्र्यवादी व संस्कृतिसंरक्षक जागतिक लोक शाही अशा स्वरूपाचें हें प्रचलित महायुद्ध आहे. अशी घोषणा आपण वारंवार ऐकतों. जागतिक स्वातंत्र्याच्या व मानवी-संस्कृतीच्या संरक्षणासाठीं आपण 'लोकशाही' दोस्तराष्ट्रांच्या बाजूनं आपण सर्वस्व पणाला लावून लढलं पाहिजे, अशीहि आपणांस शिकवण मिळते.

या म्हणण्यांत यत्किंचित्हि सत्यांश असता तर, ब्रिटन व इतर दोस्तराष्ट्रं यांनीं कॉंग्रेसच्या 'ऑगस्ट' ठरावाला तात्काळ मान्यता दिली असती. गांधीजी, कॉंग्रेस व हिंदी जनता यांच्यावर अमानुष दडपशाहीचा वरवंटा फिरविण्याचें कारणच उरतें ना. मग दडपशाही झाली नसती तर ब्रिटिशांना व दोस्तराष्ट्रांतील युद्धदेवांना न रुचणारं 'ऑगस्ट-आन्दोलन' कधीहि घडून आलं नसतं.

स्वातंत्र्यवादी व संस्कृतिसंरक्षक अशा लोकशाही राष्ट्रांना मान्य करण्यास अवघड वाटावं असं कॉंग्रेसच्या ऑगस्ट-ठरावांत काय होतं ?

काहीच नाही.

स्वातंत्र्य, मानवी संस्कृति व लोकशाही या शब्दांनी ध्वनित होणाऱ्या जीवन-मूल्यांचा तेजस्वी व स्फूर्तिदायक आविष्कार म्हणजेच कॉंग्रेसचा गांधीप्रणीत ऑगस्ट ठराव. तो अमान्य करणं याचा अर्थ हाच कीं, ब्रिटन व दोस्तराष्ट्रं यांना स्वातंत्र्य, संस्कृति व लोकशाही यांच्यापेक्षा दुसऱ्याच कोणत्या तरी गोष्टीचं अधिक महत्त्व वाटतं. ही दुसरी गोष्ट म्हणजे साम्राज्यशाहीचं वर्चस्व.

सर्व जगावर आपलंच साम्राज्यशाही वर्चस्व कायम रहावं असं ब्रिटन व इतर दोस्तराष्ट्रं यांना वाटतं. जपान–जर्मनींचीहि पण तीच इच्छा आहे. दोन साम्राज्यवादी राष्ट्रसमूहांतील तीव्रतम विरोध सामोपचारानं मिटले नाहींत म्हणूनच सांप्रतचं भीषण जागतिक महायुद्ध सुरूं झालं. जागतिक महायुद्धाच्या रूपानं सुरू असलेल्या ह्या भीषण संघर्षाशीं स्वातंत्र्य, लोकशाही, व संस्कृति यांचा काडीमात्र संबंध नाहीं. डॉ. लिन युतांग यांनीं म्हटल्याप्रमाणें सांप्रतच्या महायुद्धानं जगांतील सर्व सुबुद्ध, सुविद्य, सुसंस्कृत व प्रगतीशील लोकांसमोर एकच प्रश्न उभा केला आहे.

कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचं **साम्राज्य** हवं असणारांनी महायुद्धांत सर्वस्व पणाला लावून लढणं, हें अगदीं योग्य आहे. पण, ज्यांना स्वातंत्र्य हवं आहे त्यांनी काय करावं? हे मात्र कुणी मुत्सद्यानं, शास्त्रज्ञानं, तत्वज्ञानं, कलावंतानं, विचारवंतानं अथवा लोकनेत्यानं सांगितलं नाहीं. या प्रश्नाचं सुस्पष्ट व धीरोदात्त उत्तर देणारा एकच लोकोत्तर महापुरुष अलग दुनियेंत निघाला.

## गांधीजीच कां ?

आपले परमपूज्य नेते, महात्मा गांधी हेच अद्वितीय पुरुष होत.

आधुनिक युगाला यंत्रयुग म्हणतात तें अगदीं यथार्थ आहे. जीवनाला आवश्यक अशा वस्तूंचं उत्पादन यंत्रांच्या साहाय्यानं होऊं लागल्यानं जगांत एक नवी समाजक्रांति उदयास आली. तिच्या निशाणावर 'स्वातंत्र्य, समता व बंधुभाव' ह्या घोषघोषणा होत्या. गेल्या महायुद्धानं व विशेषत: स. १९२९ पासून सुरू झालेल्या जागतिक आर्थिक अरिष्टानं एक गोष्ट सर्व विचारवंतांना स्पष्ट करून दाखविली. ती ही की, असल्या यांत्रिक उत्पादनामुळें अनिर्बंध अशी व्यापारी स्पर्धा वाढते व जगांत शांतता, सुव्यवस्था व सामाजिक न्याय प्रस्थापित करणं अशक्य होतं. यांत्रिक उत्पादनतंत्र आणि यांत्रिक युद्धतंत्र यांच्यावर केवळ अनिर्बंध [illegible] वर्चस्व गाजविणारे मूठभर सत्तापिसाट लोक, 'स्वातंत्र्य, समता व बंधुभाव' या लोकशाहीच्या तत्त्वत्रयींत अंतर्भूत झालेल्या 'नव्या जविन मूल्यांना' अगदीं लीलेनं पायदळीं तुडवितात. म्हणून प्रश्न उद्‌भवतो कीं, खासगी मालकी हक्क व अनिर्बंध नफेबाजी यावर अधिष्ठित झालेली भांडवलशाही व साम्राज्यशाही वाईट, तर मग दुसरी कोणती विचारप्रणालि वरील जीवनमूल्यांना मूर्त रूप देऊं शकेल ?

या प्रश्नाचं एक विशिष्ट उत्तर कार्ल मार्क्स यानं स. १८४७ मध्येंच दिलं. त्या उत्तराकडे जगांतील बहुसंख्य लोकांचं व विचारवंतांचं फारसं लक्ष गेलं नाहीं. परंतु स. १९१७–१८ सालीं लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियांत मार्क्सप्रणीत साम्यवादी स्वरूपाची 'क्रांति' घडून येतांच जगांतील सर्व दलितांना, ती मानवी स्वातं-

ञ्याचा व प्रगतीचा एकमेव आशाकिरण, अशी वाटली. परंतु स्टॅलिनच्या हुकुमशाही महत्त्वाकांक्षेनं दहावीस वर्षांच्या अल्पावधींत याहि क्रांतीचा मुडदा पाडला. यासंबंधीचं अधिक विस्तृत विवेचन माझ्या 'मोन्ग्हिएट रशिया आणि हिंदुस्थान' या पुस्तिकेंत आहे.

यांत्रिक उत्पादनतंत्रामुळं मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचं व सत्तेचं केंद्रीकरण होतं. त्यामुळं मूठभर सत्तापिसाटांना व महत्त्वाकांक्षी लोकांना बहुजन समाजावर अनियंत्रित सत्ता सहज गाजविता येते. त्याच्या आसुरी महत्त्वाकांक्षेला सीमा उरत नाहीं. म्हणूनच वारंवार महायुद्धं होतात. सांप्रतचं महायुद्ध म्हणजे यंत्रयुगानं सुरू केलेल्या युद्धपरंपरेचा अतिभयंकर असा परमोच्च बिंदु होय.

आधुनिक विज्ञानशास्त्र व आधुनिक यंत्रं हीं मानवी **प्रगतीचीं** साधनं बनण्याऐवजी तीं मानवी **विध्वंसाचींच** साधनं बनलीं. आधुनिक विज्ञानशास्त्राचा व आधुनिक यंत्रांचा उपयोग सर्व मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठी व सामाजिक प्रगतीसाठी तेवढा व्हावा यासाठी जगांतील बहुसंख्य सामान्य जनतेनं काय केलं पाहिजे ?

या प्रश्नाचं सुस्पष्ट व धीरोदात्त उत्तर देणारा पहिला महापुरुष म्हणजे म. गांधी हाच होय. या दृष्टीनं गांधीजी हेच खरे युगप्रवर्तक होत.

काय केलं गांधीजींनी ?

यंत्रयुगानं सुरू केलेल्या अधिकाधिक भीषण अशा युध्दांच्या मानवताविध्वंसक दुष्टवर्तुळांतून मानवांची सुटका करण्यासाठी त्यांनी कोणता नवा मार्ग दाखविला ?

बेसुमार नरसंहार करणारीं महायुद्धं कायमचीं बंद पाडली पाहिजेत अशी भाषा जगांतील सर्वच विचारवंत बोलतात. पण निव्वळ बोलण्यानं युद्धं बंद करून टाकतां आलीं असतीं तर अधिक काय पाहिजे होतं ? कोणत्याहि युद्धानं सामान्य जनतेचा काडीमात्र फायदा कधीच झालेला नाही. तरीहि, प्रत्येक राष्ट्रांतील सामान्य जनता प्रत्येक युद्धांत, दाण्यानं जनावरं ओढावीं तशी, ओढून भस्मसात झाली फायदा झालाच असेल तर राष्ट्राराष्ट्रांतील मूठभर युद्धदेवांचा व सत्ता–पिसाटांचा.

हे मूठभर सत्तापिसाट लोक बहुसंख्य सामान्यांची फसवणूक वारंवार कशी करूं शकतात ?

केवळ दोनच साधनांनी–भीति व लाचलुचपत.

यांत्रिक उत्पादन पद्धतीमुळं संपत्तीचं तसंच विध्वंसक यंत्रांचंहि केंद्रीकरण होतं. आपल्या सत्तेला दुसऱ्या सत्तापिसाटांकडून भय उत्पन्न होतांच, मूठभर सत्ताधारी लोक, आपल्या प्रजाजनांना कंठशोष करून सांगूं लागतात; ' हा पहा तुमच्या प्राणप्रिय राष्ट्रावर, तुमच्या धनदौलतीवर, तुमच्या संस्कृतीवर, तुमच्या सर्वस्वावर हल्ला होत आहे. हा घ्या पगार आणि व्हा सैन्यांत दाखल. हा घ्या पगार आणि करा भराभर शस्त्रास्त्रांचं उत्पादन. हा घ्या पगार आणि करा अधिक धान्याचं व वस्त्रादिकांचं उत्पादन. देशरक्षणासाठी संग्रामांत उडी घ्या व शत्रूच्या नरडीचा घोट घ्या. ' युध्दकालीन परिस्थिति म्हणजे आणीबाणीची वेळ. मग साधा आज्ञाभंग भयंकर वाटतो व त्याचें स्वरूप तीव्र ठरून शिक्षा देखील कडक होते.

काय करतील बिचारे सामान्य लोक? त्यांना सैन्यांत अथवा कारखान्यांत भरती होणं भाग पडतं. शासनाच्या भीतीनं त्यांना सत्ताधीशांपुढे नमावं लागतं. पगाराची लाचलुचपत व शासनाची भीति यांच्या कात्रींत सापडून सर्व देशांतील सामान्य जनता वारंवार युद्धांत ओढली जाते.

हे सर्व आपल्या अलौकिक प्रतिभेनं ओळखून गांधीजींनी निशस्त्र सामान्यांसाठी एक नवं सामुदायिक प्रतिकार–तंत्र आकारास आणलं. हिंसात्मक प्रतिकार करावयाला यांत्रिक शस्त्रास्त्रांची जरूर असते. आणि यांत्रिक शस्त्रास्त्रांवर मालकी असते सत्ताधाऱ्यांची. म्हणून निःशस्त्र अशा साध्या माणसांना सशस्त्र प्रतिकार यंत्रयुगांत अशक्य होतो. म्हणून गांधीजींनी अहिंसात्मक सामुदायिक प्रतिकाराचं एक नवं तंत्र प्रचारांत आणलं.

अहिंसा हे एक परम मंगल, उदात्त व दिव्य असं मानवी जीवनमूल्य आहे. जगांतील कोणताहि सुबुध्द व सुजाण माणूस, फार काय सत्ताधारी देखील, हिंसेचा उघड उघड पुरस्कार करीत नाही. हिंसा व नरसंहारक युध्दं हीं कायमची नाहींशीं करून टाकण्याची भाषा बोलूनच प्रत्येक राष्ट्रांतील सत्ताधारी आपल्या प्रजाजनांना युध्दासाठी अनुकूल करून घेतात. केवळ आपध्दर्म म्हणूनच हिंसेचा पुरस्कार अशा लढाईच्या वेळी सत्ताधारी लोक करीत असतात. पण या आपध्दर्माचं, म्हणजेच नरसंहारक महायुध्दाचं दुष्टवर्तुळ अखंड चालू आहे. मानव जातीला, या दुष्टवर्तुळांतून कायमचं बाहेर पडायचं असेल तर युध्दांचा अहिंसात्मक

प्रतिकार करण्यासाठी धीरोदात्तपणें प्राण पणाला लावून केव्हाना केव्हा पुढं सरसावलंच पाहिजे.

सत्तापिसाटांच्या आसुरी महत्त्वाकांक्षाची बाहुली बनून दर वीसपंचवीस वर्षांनी लाखों लोकांची एक एक पिढी खाईत लोटण्यास राजी होण्यापेक्षा मानवांची केवळ एकच पिढी धैर्यानं व सुजाणपणं आत्मबलिदानासाठी तयार होईल, तर जगातून महायुद्धाचं कायमचं व समूळ उच्चाटन निःसंशयपणें होईल. हा असा आत्मबलिदानात्मक अहिंसेचा नाविन्यपूर्ण संदेश देणारा पहिला धीरोदत्त महापुरुष म्हणजे आपले गांधीजी होत.

गांधीजींची अहिंसा जगातील बहुसंख्य लोकांना आज हास्यास्पद वाटते. पण उद्या वारंवार होणाऱ्या नरसंहारांनी डोळे उघडे होऊन जरा अधिक सुजाणपणा येतांच जगातील बहुसंख्य लोकांना अहिंसेच्या थोर जीवनमूल्याची यथार्थ जाणीव झाल्याशिवाय खास रहाणार नाही विध्वंसक युद्धांच्या दुष्टवर्तुळातून कायमचं बाहेर पडण्याचा एक मार्ग हाच आहे. सत्ताधाऱ्यांच्या गोळ्यांखाली आज गतप्राण होणाऱ्या हिंदी जनतेला उद्या अहिंसेचं अधिक सुसंस्कृत असं नवं युग निर्माण करूं इच्छिणाऱ्या जगांत अग्रेसर आघाडीचा मान मिळेल.

पण अहिंसेचा पुरस्कार हा गांधीजींच्या क्रांतिकारक तंत्राचा केवळ एक भाग होय. युद्धपरंपरेच्या दुष्टवर्तुळाचं मूळ संपत्तीच्या व यंत्राच्या केंद्रीकरणांत आहे हें ओळखून विकेंद्रीकरणाचं

(Decentralisation चं) महान् सामाजिक प्रमेय त्यांनी शोधून काढलं. आपल्या देशातील प्रत्येक खेडं व प्रत्येक शहर आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झालं पाहिजे; खेड्यांपाड्यातून सहज मिळणाऱ्या साधनांवरच विसंबून आपलं सर्व समाजजीवन पूर्णपणें स्वावलंबी व सत्तानिरपेक्ष बनवलं पाहिजे. या गोष्टीवर भर देण्यांत गांधीजींनी प्रकट केलेली विधायक कल्पकता अनन्यसाधारण आहे.

जगातील कोणत्याहि राष्ट्रातील सामान्य जनतेला खरं स्वातंत्र्य संपादन करावयाचं असेल तर तिला यांत्रिक उत्पादनाच्या केंद्रीकरणाला विरोध करणं आज ना उद्या आवश्यक आहे. गांधीजींचा यंत्रांनाच विरोध आहे, असा याचा अर्थ नव्हे. गांधीजींचा खरा विरोध संपत्तीच्या केंद्रीकरणाला आहे. त्यामुळं मूठभर लोकांच्या हातीं सर्व सत्ता केंद्रित होत असते. ह्या केंद्रीकरणामुळे जगभरच्या सामान्य जनतेला अमानुष गुलामगिरी व महायुद्धाची आपत्ति भोगावी लागते. या केंद्रीकरणावर सुजाणपणें सामुदायिक आघात केल्याशिवाय खऱ्या स्वातंत्र्याचा उदय होणं अशक्य आहे. म्हणून स्वावलंबी, स्वयंपूर्ण विकेंद्रीकरणात्मक अर्थव्यवस्था हाच खऱ्या स्वातंत्र्याचा महामंत्र आहे.

आज मानवी समाज यंत्राचा गुलाम बनलेला आहे. यंत्राच्या गुलामगिरींतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे विकेंद्रीकरणात्मक अर्थव्यवस्था. ती आकारास आणणं ही सर्वस्वी बहुजनसमाजाच्या हातची गोष्ट आहे. लाचलुचपत व शासनाची भीति या दोन दुर्गुणां- पासून अलिप्त रहाण्याचाहि हाच मार्ग आहे. या दृष्टीनें पहातां गांधीजींचा अखिल भारतीय चरखा संघ व अखिल भारतीय

ग्रामोद्योग संघ यांच्या मुळाशी असलेल्या क्रांतिकारक कल्पकतेचं महत्त्व कोणच्याहि सहज ध्यानांत येण्यासारखं आहे.

गांधीजींनी प्रथम असहकाराची घोषणा केली. ती केवळ अकारणात्मक आहे, हे दिसून येतांच त्यांनी हा असहकार यशस्वी होण्यासाठी चरखा व ग्रामोद्योग यांची तिला जोड दिली. गांधीप्राणित समाजक्रांति तंत्राचं मूळ सत्याग्रहांत साठलेलं नसून, तें वस्तुत: सामुदायिक असहकारातच साठलेलं आहे. चरखा व ग्रामोद्योग यांच्या आधारावर सर्व खेडेविभाग स्वावलंबी, स्वयंपूर्ण व सत्ता· निरपेक्ष बनविणं हेंच स्वातंत्र्याच्या व नव्या समाजक्रांतीच्या दृष्टीनं आद्य महत्त्वाचं कार्य आहे. यंत्रयुगातील चुकीच्या जीवनमूल्यांना भाळून या कार्याकडे आम्ही आधुनिकांनी आजवर दुर्लक्ष केलं. आमच्या सुशिक्षित तरुण वर्गानं चरखा व विविध प्रकारचे ग्रामोद्योग यांच्या आधारावर आमचा खेडेविभाग स्वावलंबी, स्वयंपूर्ण व सत्तानिरपेक्ष बनविण्याकडे आपली सारी शक्ति कांही काळ केंद्रित केली तर गांधीप्रणीत असहकारांत किती क्रांतिकारकता साठली आहे याची साक्ष अल्पावधींत पटेल !

संपत्तीच्या व यंत्रांच्या केंद्रीकरणांतून जागतिक साम्राज्यशाही व झोटिंगशाही याशिवाय दुसरं कांहीच निष्पन्न होणं शक्य नाही• व्यक्तिस्वातंत्र्य, राष्ट्रीय स्वातंत्र्य, आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था ही मूर्तरूपात जगांत प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे वर वर्णिलेला गांधीप्रणीत मार्ग होय. या मार्गाची सफलता एकाच गोष्टीवर अवलंबून आहे. ही गोष्ट म्हणजे नव्या जीवनमूल्यांवरील अढळ

निष्ठा. साम्राज्यविरोधी स्वातंत्र्याच्या शाब्दिक घोषणा नित्य करावयाच्या, पण दैनंदिन जीवनांत क्षणाक्षणाला संपत्तीच्या व यंत्राच्या केंद्रीकरणाला मदत करीत रहावयाचं, ही प्रथा निश्चयानं बंद पाडल्याशिवाय खऱ्या स्वातंत्र्याचा उदय होणं अशक्य आहे.

स्वातंत्र्यासाठी आपण व्यक्तिशः, आपल्या क्षणाक्षणाच्या जीवनांत काय करावयाला तयार आहोंत, असा प्रश्न प्रत्येकानं आपल्या मनाला जरा गंभीरपणें विचारला पाहिजे. आपली बुद्धि, कार्यशक्ति व सर्व जीवशक्ति प्रत्यही व प्रत्येक क्षणाला आपण कशी खर्च करीत आहोंत, याचा प्रत्येकानं आपल्या मनाशीं गंभीरपणें विचार केला पाहिजे. आपल्याला साम्राज्यांतर्गत गुलामगिरी पाहिजे की, स्वातंत्र्य पाहिजे, असा प्रश्न आपल्या नजरेसमोर नित्य ठेवून आपली कार्यशक्ति, बुद्धि व आपली सर्व जीवशक्ति आपण वज्रकठोर निश्चयानं स्वातंत्र्याच्या ध्येयावर केंद्रित केली, तरच नव्या जीवनमूल्यांवर आपली खरी निष्ठा आहे, हें सिद्ध होईल. स्वातंत्र्यासाठी ही अशा प्रकारची नवी सामाजिक जाणीव उदयास आणणं अत्यावश्यक आहे. केंद्रीभूत यंत्रशक्तीच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावयाचं असल्यास मानवांची जीवनशक्ति ही अधिक सुजाण, अधिक निःस्वार्थ व अधिक धैर्यशाली बनली पाहिजे. असं झालं तरच आधुनिक यंत्रांचा उपयोग मानवजातीच्या कल्याणासाठी करण्यास समाज समर्थ होईल.

यंत्रयुगाच्या प्रथमावस्थेंतून उगम पावून जागतिक साम्राज्यवादांत परिणत झालेलीं जुनीं जीवनमूल्यं एकीकडे व सर्व यंत्रांचा मानवी कल्याणासाठीच सुबुद्धपणें उपयोग करण्याची आकांक्षा बाळग-

णारी व खऱ्या मानवी स्वातंत्र्यांत परिणत होणारीं नवीं जीवनमूल्यं दुसरीकडे,—असा एक नवा जागतिक संघर्ष सांप्रत आकारास येत आहे. या नव्या जागतिक संघर्षाचे आद्य प्रणेते म्हणून गांधीजींचं नांव जगाच्या इतिहासांत अजरामर झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

आधुनिक यंत्रयुगानं जें जागतिक परिवर्तन घडवून आणलं आहे त्याला अधिक मानवी, अधिक उदात्त व अधिक प्रगतिशील स्वरूप कसं द्यावं हा सध्याच्या युगाचा महान् प्रश्न आहे. या प्रश्नाचं अंतरंग यथार्थपणें समजून घेण्यावर मानवी स्वातंत्र्य अवलंबून आहे. साम्राज्यशाही व झोटिंगशाही यांच्यामुळं मानवी स्वातंत्र्याचा संपूर्ण नायनाट होऊन विज्ञानशास्त्रीय यंत्रयुगाला पुरातन व रानटी अशा काळया युगाचं स्वरूप येणार आहे. चालू महायुद्ध संपतांच या काळया युगाची भीषणता व अमानुषता जगाला ताबडतोब जाणवूं लागेल. स्वातंत्र्याच्या जीवनमूल्यांसाठी जगातील सर्व सामान्य-मानवांना एका नव्या स्वरूपाचा संग्राम सुरू करावा लागेल, त्याची यथार्थ जाणीव गांधीजींशिवाय इतर कुणालाहि होऊं शकली नाही. आणि हेंच गाधीजींच्या महात्मतेचं खरं कारण आहे.

गाधीजीच कां? या प्रश्नाचं उत्तर हें असं आहे. आज गाधीजी स्वस्थ बसल्यासारखे दिसत असले तरी, उद्या ते सर्व स्वातंत्र्यवादी व प्रगतिवादी दलित जनतेचे एकमेव महान् नेते म्हणून सर्व जगाला वंदनीय वाटूं लागतील. हिटलर, टोजो अथवा रूझवेल्ट, स्टॅलिन, चर्चिल यांचं आजचं मोठेपण उद्या अत्यंत क्षुद्र व अर्थशून्य वाटूं लागेल. कारण नव्या युगाची खरी जाणीव

या जगज्जेत्या युद्धदेवांना काडीमात्र झाल्यासारखी दिसत नाही. उद्याच्या मानवांना व उद्याच्या समाजाला काय पाहिजे हें आज यथार्थतेनं जाणणारा जगातील एकच महापुरुष म्हणजे महात्मा गांधी. आज गांधीजी बोलत आहेत तीच भाषा उद्या जगातील सर्व दलित मानवांच्या मुखांतून बाहेर पडेल. आज गुलामगिरीच्या शृंखलांनी बद्ध झाल्यामुळे सर्व राष्ट्रांच्या मागं दिसत असलेला आपला भारतवर्ष उद्या नव्या जागतिक समाजक्रांतीचा नेता होईल.

ऑगस्ट–आन्दोलनानं व सध्याच्या जागतिक महायुद्धानं माझ्या मनात व दृष्टिकोनांत जें जें परिवर्तन घडवून आणलं आहे त्याचं स्वरूप स्थूल मानानं वर सांगिल्याप्रमाणं आहे. ऑगस्ट–आन्दोलन सुरू होईपावेतो माझी मार्क्सप्रणीत साम्यवादावर पूर्ण श्रद्धा होती. रशियावर जर्मनीनं हल्ला चढवितांच रशियाचं संरक्षण करणं व त्यासाठी सर्वस्व पणाला लावणं हेंच जगातील सर्व दलितांचं आद्य कर्तव्य आहे असं मला वाटलं. कारण मार्क्सवादाचं प्रात्यक्षिक म्हणजे सोव्हिएट रशिया, अशी माझी समजूत होती. परंतु कॉंग्रेसचा ऑगस्ट-ठराव, हा सोव्हिएट रशिया, चीन व इतर दोस्त राष्ट्रं यांना पूर्ण अनुकूल असताहि, ब्रिटिश साम्राज्यशाहीनं कॉंग्रेसवर व हिंदी जनतेवर हल्ला चढविला; या हल्ल्याचा यथायोग्य निषेध एकाहि दोस्त राष्ट्रानं केला नाहीं. उलट, रशियाच्या येथील पंचम दळानं (कम्युनिस्ट पक्षानं) स्वातंत्र्यासाठीं आत्मबलिदान करणाऱ्या आमच्या शूर व ध्येयवादी देशबांधवांना 'पंचम दळी' म्हणून हिणवलं. स्टॅलिननं तर हिंदी स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकणाऱ्या ब्रिटिश सरकारच्या लष्कराचं वारंवार अभिनंदन केलं.

ह्या घटनेमुळं माझ्या मनांत व दृष्टिकोनांत आमूलाग्र परिवर्तन घडून आलं; माझी सर्व मतं, पूर्वग्रह व माझ्या निष्ठा परिस्थितीच्या वास्तवावर पुन्हा एक वार घासून पहाणं मला क्रमप्राप्त झालं. सर्व 'मडकीं' कच्चीं निघाल्यामुळं 'गांधीजीच कां?' या प्रश्नाचा मीं विचार करूं लागलों. या विचाराचं पहिलं फळ म्हणजे ही लेखमाला होय.

ऑगस्ट–आन्दोलनांत जे अनेक भलेबुरे अत्याचारी प्रकार घडले त्यांचं समर्थन करण्याच्या उद्देशानं मीं हे सर्व लिहिलेलं नाहीं. जें प्रत्यक्षपणें व प्रचंड प्रमाणांत घडलं त्याची वैचारिक व तात्त्विक पार्श्वभूमि शोधून काढणं, एवढाच माझा हेतु आहे.

गांधीजींच्या नव्या क्रांति-तंत्राबद्दल किती तरी लिहिण्यासारखं आहे. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रही गांधीजी, १९२०–२१ सालचे असहकारवादी गांधीजी, १९३०–३२ सालचे सविनय कायदेभंगवादी गांधीजी आणि सन १९४२ सालचे सर्वस्व पणाला लावणारे अस्सल साम्राज्यविरोधी व पूर्ण स्वातंत्र्यवादी गांधीजी—ही गांधीजींच्या विकासाची चढती कमान विस्मयकारक व स्फूर्तिदायक अशी आहे गांधीजींचा हा विकासक्रम व या विकासक्रमानुसार अधिकाधिक अर्थपूर्ण व प्रभावशाली झालेलं त्यांचं अभिनव समाज–परिवर्तन–तंत्र, या बाबत लिहावयाचं म्हणजे एक महाभारतच होईल. अधिक सवड मिळाली तर पुढेमागे हें 'आधुनिक महाभारत' लिहिण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन. पण तूर्त एवढंच सांगायचं कीं, स्वातंत्र्याची व समाजक्रांतीची स्फूर्ति घेण्यासाठी आम्हां भारतीयांना परक्यांच्या

इतिहासाकडे पहाण्याचं आता कांही कारण नाही. जागतिक स्वातंत्र्याचं व नव्या समाजक्रांतीचं ब्रह्मास्त्र आपल्या या पुण्य मायभूमीत आकारास येत आहे. गांधीजींचं तेजस्वी नेतृत्व आणि हिंदी जनतेची क्रांतिकारक धडाडी, हीच आता नव्या जगाची एकमेव स्फूर्ति-ज्योत बनली आहे. या गोष्टीची अल्पशी जाणीव जरी वाचकांना झाली तरी ही लेखमाला लिहिण्याचे श्रम सत्कारणीं लागले, असं मला वाटेल.

---

परिशिष्ट : १

# भारताचा महापुरुष – म. गांधी

ता. २ ऑक्टोबर १९४४ रोजीं म. गांधींच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झालीं. या प्रसंगीं हिंदुस्थानांतील असंख्य लोक व इतर देशांतील अनेक सुबुद्ध लोक म. गांधींना दीर्घायुरारोग्य चिंतितील. असंख्य मानवांच्या या सदिच्छेशीं आम्हीं अंतःकरणपूर्वक सहभागी होऊं इच्छितो.

देश–काल–परिस्थिति आणि व्यक्तिमनांतील आंतरिक शक्ति यांच्या संघर्षांतूनच मनुष्याचें व्यक्तिमत्व आकारास येत असतें. हा संघर्ष जितका उत्कट व या संघर्षावर मात करण्याचें व्यक्तिमनाचें जितकें सामर्थ्य त्या मानाने कोणंत्याहि माणसाचें व्यक्तिमत्व कमी-

अधिक प्रभावी ठरत असतें. विद्यमान देश काल-परिस्थितीवर गांधीजींनी आपल्या स्वतःपुरती एक वैशिष्ट्यपूर्ण मात करून दाखविली. हें वैशिष्ट्य इतकें प्रभावी ठरलें कीं, गांधीजी अल्पावधीत जगातील सर्व विचारवंतांना आणि भारतातील व इतर देशातील असंख्य दलितांना एक अत्यंत आदरणीय व वंदनीय असे 'महात्मा' भासूं लागले.

सारे देशबांधव निःशस्त्र, निस्तेज व निराश झालेले; परकीयांच्या जुलमी राज्यव्यवस्थेमुळे सारें समाजजीवन अवमानित झालेलें; भारताचा भव्य कल्पनाविहार विडंबित झालेला; सर्व पुरातन पूज्य तत्त्वांचा पाचोळा झालेला; विजयी झालेल्या पाश्चात्यांच्या वैभवशाली नवसंस्कृतीपुढे सारे पौरस्त्य शरणागत झालेले; अशा वातावरणाचे संस्कार मनावर घेत घेत लहानाचे मोठे झालेले मोहनदास करमचंद गांधी दक्षिण आफ्रिकेत वकिलीचा धंदा करण्यासाठी स्थायिक झाले. आपल्या कर्तबगारीच्या जोरावर, आपल्या विशिष्ट नैतिक कल्पनांचें असिधाराव्रत काटेकोरपणें संभाळून गांधीनी हजारो रुपये मिळविले. खुल्या चढाओढीच्या वातावरणांत त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेने व चारित्र्याने बरोबरीच्या पाश्चात्यांवर मात करून दाखविली. मनुष्य या नात्यानें हिंदी मनुष्य जगातील कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्रातील मनुष्यापेक्षा कोणत्याहि दृष्टीने कमी नाही, याची साक्ष त्यांनी स्वतःला व सर्वांना पटविली.

परंतु पैसा, बुद्धिमत्ता, कर्तबगारी, चारित्र्य, सुसंस्कृतपणा, मानवता हे सर्व अमोलिक गुण केवळ एका दोषामुळे शून्यवत् ठरले.

हा दोष म्हणजे गुलामगिरीचा कलंक; एका संस्कृत सुभाषितांत सर्व रत्नांमध्यें 'यश' हेंच एक निर्दोष रत्न आहे, असें मानण्यात आलें आहे. गांधींनी यश पुष्कळ संपादन केलें; परंतु हें सर्व यश गुलामगिरीच्या कलंकामुळे अर्थशून्य ठरलें. आधुनिक जगांत मानवी गुणाचें यथायोग्य मोल राजकीय स्वातंत्र्याशिवाय होऊं शकत नाही. पारतंत्र्यामुळे सारे उत्तमोत्तम गुण कवडीमोल ठरतात, या गोष्टीचा उत्कट अनुभव दक्षिण आफ्रिकेतच गांधींना पुरेपूर आला.

पण राजकीय स्वातंत्र्य कसें प्राप्त करून घ्यावयाचें? अर्ध्या जगावर सत्ता गाजविणारी, परकीय साम्राज्यशाहीची प्रचंड पाशवी शक्ति एकीकडे आणि मो. क. गांधी ही एक बलहीन व्यक्ति दुसरीकडे, अशा विषम संग्रामांत विजयाची आशा करणे कोणत्याहि सुबुद्ध माणसाला कसें शक्य होणार?

पदोपदीं प्रत्ययास येणारा अपमान आणि त्या बरोबरच क्षणोक्षणीं अंतःकरणाला घरें पाडणारी असहायता, अशा भयानक संघर्षाची यातना गांधींना जेरीस आणूं लागली. स्वदेशबांधवांना साधा न्याय मिळावा यासाठी थोडासा यत्न करूं लागतांच बुटाच्या ठोकरा, फटके, तुरुंगवास अशी भेसूर श्रेणी त्यांना अनुभवास येऊं लागली.

'दुःखाचा कडेलोट होणें हीच त्याची 'दवा' आहे,' अशा आशयाचें कवि गालिबचें एक कवन आहे. अमानुष अपमानांच्या अतिरेकामुळे आंतरिक द्वेष सहनशीलतेच्या सीमेवर जातांच त्याचें

विशुद्ध मानवतेच्या साक्षात्कारांत रूपांतर घडून आलें. द्वेष, हिंसात्मक प्रतिकार आणि ध्येयसाधन या त्रयीच्या ऐवजी, प्रेम, अहिंसा आणि सत्यशोधन ही त्रयी गांधीजींच्या अंत:करणांत प्रस्थापित झाली.

गांधीजी जेव्हां 'प्रेम' हा शब्द वापरतात, तेव्हा बुटाच्या टोकरा, फटके व अमानुष तुरुंगवास यांच्या अनुभवाने अंतःकरणांत उमळलेल्या द्वेषाचें रूपातरित तात्त्विक स्वरूप, असा त्याचा गर्भितार्थ असतो गांधीजी व्हाइसरॉयना 'परम मित्र' असे विशेषण जेव्हा लावतात, तेव्हा द्वेषजन्य शत्रुत्वाचें मित्रभावात घडून आलेलें तात्विक रूपांतर, असाच त्याचा अर्थ असतो. हे थोतांड नव्हे, ही फसवेगिरी नव्हे, हा भोदूपणा नव्हे, तर हा आत्यंतिक दुःखाचा, अपमानजन्य आत्यंतिक द्वेषाचा, असहायताजन्य असा अति करुण व सजीव तत्त्वात्मक असा आविष्कार आहे.

दक्षिण आफ्रिकेतील तुरुंगांत असतांना मला भंग्याचें काम द्या, अशी सविनय विनंती गांधींनी अधिकाऱ्यांकडे केली व यासाठी ते सत्याग्रही हट्ट धरून बसले. जनरल स्मट्सनी नाइलाज होऊन त्यांना तें काम देवविलें. तुरुंगातून सुटून येतांच त्यांनी ज. स्मट्स् याची भेट घेतली व 'मला भंग्याचें काम दिलें याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे' असें त्यांनी कळवळून सांगितलें. हा कळवळा म्हणजे थोतांड नव्हतें. असहायतेमुळे छिन्नविछिन्न झालेल्या अहंतेचा आत्यंतिक पददलित समजल्या जाणाऱ्या भंग्याच्या जीवनाशी समरस होऊन जाण्याचा तो एक प्रामाणिक प्रयत्न होता. पारतंत्र्यांत रहाणारा प्रत्येक मनुष्य भंग्यापेक्षा अधिक श्रेष्ठ नाही, या मनोमय जाणिवेचा तो एक अनुभवजन्य आविष्कार होता.

प्रतिकाराच्या अशक्यतेमुळे आकारास आलेल्या करुण असहायतेने दलित जीवनाची नीचतम सीमा गाठली. हा अनुभव जितका हृदयद्रावक तितकाच परिणामी शक्तिशाली ठरला. दक्षिण आफ्रिकन सरकारला गांधीजींच्या अनाकलनीय वृत्तीचा अर्थच कळेनासा झाला. ते सोंग नव्हते, ते थोतांड नव्हतें, याची साक्ष त्यांना वारंवार पटूं लागली. आणि अखेरीस या अभिनव सत्याग्रहा तंत्रापुढे हात टेकून स्मट्स् यांनी गांधीजींशी करार केला. या करारानें दक्षिण आफ्रिकेतील हिंदी प्रजाजनांना माणुसकीचा मान इतिहासांत पहिल्यानेच प्राप्त झाला—आज या कराराच्या स्मट्स् स्वतःच चिंधड्या उडवित आहेत. पण आता एका गांधीऐवजी तेथील सारी हिंदी प्रजा, सारा हिंदुस्थान, व खुद्द हिंदुस्थान सरकारदेखील आफ्रिकेतील हिंदी जनतेच्या पाठीशी गांधी-स्मट्स् कराराचा मान राखला जावा यासाठी, एकजुटीने पुढे सरसावले आहे. गांधीजींच्या वैयक्तिक ‘ प्रतिकाराला ’ आज सामुदायिक प्रतिकाराचें प्रभावशाली रूप प्राप्त झालें आहे. या प्रभावशाली शक्तीपुढे दक्षिण आफ्रिकन सरकारला आज ना उद्या नमावेंच लागेल.

दक्षिण आफ्रिकेंत केलें तेंच अत्यंत विराट स्वरूपांत गांधीजींनी हिंदुस्थानांत करून दाखविलें. आपल्या अहिंसात्मक व्यक्तिनिष्ठ प्रतिकारातून त्यांनी असहाय व हतबुद्ध झालेल्या हिंदी जनतेची सामुदायिक प्रतिकार-शक्ति प्रज्वलित केली. आफ्रिकेतून हिंदुस्थानांत ते आले, तेव्हा त्यांना अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ हिंदी पुढाऱ्यांनी व खुद्द लोकमान्यांनासुद्धा असें परोपरीने सांगितलें की, सत्याग्रहाचें तंत्र

आफ्रिकेतील चिमुकल्या लोकसंख्येबाबत तेथील विशिष्ट परिस्थिती-मुळे यशस्वी झालें असलें, तरी हिंदुस्थानच्या निराळया व अधिक गुंतागुंतीच्या परिस्थितीत व पस्तीस कोटी लोकसंख्येच्या विराट प्रदे-शाला ते लागू करता येणे शक्य नाही. म. गांधींनी सर्व महनीय पुढाऱ्यांचा उपदेश विनम्रपणें ऐकून घेतला.

पण लवकरच चंपारण्यांतील मजुरांच्या करुण कथा त्यांच्या कानी आल्या. ते चंपारण्यांत गेले. तेथील मजुरांच्या घरांची झाड-झोट करूं लागले. पण थोड्या अवधीत त्या मजुरांनीं त्यांना विनवून सांगितलें की, 'महाराज आपण येथून तावडतोब कुठे तरी दूर निघून जा. आमचा साहेब मोठा भयंकर माणूस आहे. तो म्हणाला, "तो झाडझोट करणारा काला आदमी पुन्हा तुमच्या झोपड्यात दिसला तर त्याला व तुम्हांलाहि मी गोळी घालून ठार करील."

"कुठे आहे तुमचा साहेब ?" गांधीजींनी त्या मजुरांना विचारलें. त्यांनी आपल्या साहेबाचा बंगला त्यांना दुरून दाखविला. गाधीजी थेट त्या बंगल्याकडे गेले. साहेब क्रुध्द मुद्रेने त्यांच्याकडे बघूं लागतांच ते विनम्रपणें म्हणाले, "मला असं कळलं आहे की, आपण मला गोळी घालून ठार करूं इच्छितां. मी आपल्यासमोर उभा आहे. कृपा करून मला गोळी घालून ठार करा."

साहेब थक्क झाला !—अर्थात गांधीजींच्या छातींत गोळी घालण्याचें त्याला धैर्य झालें नाही. चंपारण्यांतील मजुरांच्या परि-स्थितीची दाद घेणें सरकारला भाग पडलें !

'मला गोळी घालून ठार करा' असें महात्माजी म्हणाले तें केवळ नाटक नव्हतें, केवळ साहस नव्हतें, ती केवळ एक हूल नव्हती. परतंत्र जीवन, दलित जीवन आणि मरण यांची समरसता त्यांनीं अनुभविली होती. परतंत्र जीवनापेक्षां मरण श्रेष्ठ याची साक्ष त्यांना पटली होती. जीवनातील अनेक प्रकारच्या अहंतेला, अनेक प्रकारच्या अभिनिवेशांना त्यांनी मूठमाती दिली होती. शिक्षणाचा, ज्ञानाचा आपल्या अंगच्या अनेक गुणांचा, संस्कृतीचा आपल्याला थोड्या बहुत प्रमाणांत नित्य अभिमान वाटत असतो. परतंत्र आणि असहाय जीवनांत या सर्व अभिमानाला कवडीचीहि किंमत नाहीं, दलितांच्या क्षणकाल मानवी जीवनासाठी मृत्यूचें मोल द्यावें लागलें तरी तें लीलेनें दिलें पाहिजे, या सत्याची सखोल जाणीव गांधीजींना झालेली आहे. व्यवहार, परिस्थिति, शहाणपणा, चातुर्य, मुत्सद्देगिरी इत्यादि प्रमेयें त्यांच्या दृष्टीनें त्यांना अर्थशून्य झालीं आहेत. आपलें चिमुकलें जीवन, आपले परिमित अनुभव, आपली व्यक्तिनिष्ठ जाणीव यांच्या माध्यमांतून जें आपल्या प्रत्ययास येईल तेंच आपलें ज्ञान, तोच आपला मार्ग! याच मार्गानें गांधीजींनी आपली आजवरची जीवनयात्रा केली. पण या चिमुकल्या व्यक्तीची जाणीव आज चाळीस कोटींच्या हिंदी जनतेची जाणीव झालेली आहे. एक काळ असा होता कीं, ज्या वेळीं मरणाच्या भीतीनें सारा हिंदी समाज हतबुद्ध होऊन मृतवत् पडला होता. आज असंख्य लोक मानवी जीवनाप्रीत्यर्थ मरणाशी झुंज घेण्यासाठी पुढे सरसावूं लागले आहेत!

महात्माजींच्या जीवनाचें सार हें असें आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अत्यल्प आत्म्याला विशाल मानवतेच्या महात्मतेचं व्यक्तिनिष्ठ, जीवन-

निष्ठ दर्शन घडविणें हेंच महात्माजींचे जीवितकार्य! हे कार्य इतकें मोठें, इतकें अर्थपूर्ण आहे की, त्याची यथार्थ जाणीव जगाला झाली तरच 'नवें जग' निर्माण करणे मानवी समाजाला शक्य होईल!—

महात्मा गांधी चिरायु होवोत!

## परिशिष्ट : २

# कस्तुरबा गांधी

——(÷)——

गेल्या महाशिवरात्रीस सायंकाळीं ७–३५ ला सौ. कस्तुरबा गांधी यांचें प्राणोत्क्रमण झालें.

मरण ही एक अशी घटना आहे की, तिचा विचार करूं लागतांच मानवी विचारशक्तीला एक निश्चित सीमा आहे असा अनुभव येऊं लागतो. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' हें मरणाबद्दल मानवानं केलेलं अखेरचं विधान होय. मरण हा प्रकृतिधर्मच आहे, असं म्हणावयाचं आणि स्वस्थ बसावयाचं. मरणाच्या पलीकडे माणसाची मति जाऊं शकत नाही. म्हणूनच मरण ही मानवी आकलनशक्तीची किमान मर्यादा मानून आपल्याला स्वस्थ बसावें लागतें.

सामान्य परिस्थितींत सौ. कस्तुरबा गांधी मरणाधीन झाल्या असत्या तर 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' असं म्हणून हिंदी जनतेनं

आपलं समाधान करून घेतलं असतं. परंतु कस्तुरबांना मरण आलं तें बंदिवासांत. कायद्याच्या चौकटीत हिंदी जनतेला आपलं जीवन सध्या घालवावं लागत आहे; त्या कायद्यानं म गांधी व कस्तुरबा याना हिंदी जनतेपासून दूर नेलं. कायद्याच्या दृष्टीनं हिंदी जनता आणि तिचे महान् नेते याची ताटातूट ९ ऑगस्ट १९४२ पासूनच केली.

हा कायदा हिंदी लोकांना असें अट्टाहासानें ओरडून सांगत होता की, " हिंदुस्थानातील लोकांनो, म. गांधीप्रभृति तुमचे थोर नेते हे महान् उपद्व्यापी लोक आहेत. तुमचे अकल्याण करण्याचा त्यांचा इरादा होता. या संकटापासून तुमचे संरक्षण करण्यासाठी सरकारने म. गांधींप्रभृति चळवळया लोकाना तुरुंगांत ठेवले आहे. या चळ-वळयांना तुम्ही विसरून जा. ते तुमच्यातून कायमचे नाहीसे झाले असे समजा. असे समजण्यांतच तुमचे खरें हित आहे. "

विद्यमान कायद्याची ही आकाशवाणी १९४२ सालच्या ९ ऑगस्टला हिंदी जनतेने ऐकली. परंतु हिंदी जनतेचा मुळीच विश्वास बसला नाही. तिला पार दुर्लक्षून आपल्या आवडत्या नेत्याना आपल्याजवळ आणण्यासाठी हिंदी लोकानी प्रचंड धडपड केली. 'आमचे आवडते नेते आम्हांस परत द्या. त्यांना आमच्यापासून दूर नेऊं नका,' असा आक्रोश करणाऱ्या हिंदी लोकांचीं तोंडें बंद करण्यासाठी लाठीमार, फटके, गोळीबार, हवाई बॉंब व अनिश्चित कालावधीचा बंदीवास, इत्यादि कायदेशीर मार्ग सरकारने योजले. सरकारला वाटलें, आपल्या कायद्याची सरशी झाली !

म. गांधीप्रभृति पुढाऱ्यांना कायद्याच्या नावाखालीं आपल्या-

पासून दूर नेलें, तेव्हांच त्यांचें 'कायदेशीर मरण' घडून आलें. नैसर्गिक मरणाच्या आधीं माणसांना मरण येऊं शकतें हें आपल्याला आजवर माहीत नव्हतें. कुडींतून प्राण निघून जाणें, हें केवळ स्वाभाविक मरण. परंतु कायद्याने आपले आप्त, आपले ऋणानुबंधी, आपले नेते हे आपल्यापासून कायमचे दूर होणे हें 'कायदेशीर मरण.'

कस्तुरबांचें प्राणोत्क्रमण गेल्या महाशिवरात्रीस झालें असेल. परंतु कायद्याच्या दृष्टीने मात्र ९ ऑगस्ट १९४२ रोजींच त्यांना मरण आलें. कायद्याला न मानणाऱ्या 'मूर्ख' हिंदी जनतेने हें ओळखलें नाही. म्हणून तिला वाटतें कीं, कस्तुरबा महाशिवरात्रीस मरण पावल्या. नैसर्गिक मरणावरहि मात करणाऱ्या कायद्याच्या चौकटींत आज आपण अडकलों आहोंत. आपल्या कुडींत जीव आहे असें आपणांस वाटत असलें तरी, आपण कायद्याच्या दृष्टीने मेलों आहोंत हें आपण ओळखलें पाहिजे. हें 'कायद्याचें मरण' ओलांडल्याशिवाय आपणांस खऱ्या जीवनाचा लाभ होणेंच शक्य नाही. आपल्या खऱ्या जीवनाच्या आड कायद्याची एक काळी, दगडी भिंत उभी आहे. ही भिंत वाटेंतून दूर होईपर्यंत आपणास खऱ्या जीवनाचें दर्शनच घडूं शकणार नाही. आपले नेते बंदीवासांत व आपण बाहेर असें जें आपणांस वाटतें तो नुसता भास आहे. आपण सर्वच कायद्याच्या दृष्टीने बंदीवासांत आहोंत, म्हणजे मेलेले आहोंत.

कायद्याच्या दृष्टीने विचार करतां कस्तुरबांच्या मरणाबाबत शोक करणें म्हणजे मेलेल्याने मेलेल्यासाठीं शोक करणें होय. आज आपण प्राकृतिक मरणालाहि पारखे झालों आहोंत. मरण येण्यापूर्वींच

आपणांस मरावें लागलें आहे. ही वस्तुस्थिति आपण ओळखली तर खऱ्या जीवनाचा मार्ग आपणांस दिसूं लागेल.

* * *

ही वस्तुस्थिति ओळखणारा एकच महापुरुष या आपल्या पुण्यभूमींत जन्माला आला. हा महापुरुष म्हणजे म. गांधी. म. गांधींना वस्तुस्थितीची ओळख कशी झाली ? गांधीजींचें आत्मचरित्र जे मननपूर्वक वाचतील त्यांना हें सहज कळून येईल कीं, गांधीजींना आपल्या देशाच्या जिवंत मरणाचें दर्शन घडवून देणारी दृष्टि जर कुणी दिली असेल तर ती कस्तुरबांनींच. एक काल असा होता की, आपण खऱ्याखुऱ्या अर्थानें जिवंत आहोंत असें श्री. मोहनदास गांधी यांना वाटत होतें. पण कस्तुरबा आपल्या निरागस वर्तनाने मोहनदासांना पदोपदीं असें भासवीत होत्या कीं,आपण जगत आहोंत तें जीवन नसून मरण आहे.

गांधीजी उच्च शिक्षण घेऊन विलायतेंतून परत हिंदुस्थानांत आले आणि त्यांना वाटूं लागलें, कस्तुरबा अजाण, अशिक्षित, असंस्कृत आहे. तिला सुजाण, सुशिक्षित व सुसंस्कृत केलें पाहिजे.

गांधीजींनी कस्तुरबांना सुजाण, सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याचे अनेक प्रयत्न केले. पण ते सारे विफल ठरले.

गांधीजींनी कस्तुरबांचा पेहरावहि बदलण्याचा प्रयत्न केला. जुनापुराणा हिंदुस्थानी पेहराव टाकून देऊन गांधीजीनीं कस्तुरबांच्या अंगावर आधुनिक पेहराव चढविला. पण कांहींएक परिणाम झाला

नाहीं. कस्तुरबा प्रारंभापासून तों मरणाच्या अखेरच्या क्षणापर्यंत कस्तुरबाच रोहिली.

पण गांधीजींना मात्र सतत बदलावें लागलें. विलायतचें भारी खर्चाचें उच्च शिक्षणहि त्यांना विसरावें लागलें. तें शिक्षण अर्थशून्य आहे अशी त्यांना कबुली द्यावी लागली. तो सुशिक्षितपणा व सुसंस्कृतपणा आपल्या जीवनाचा निदर्शक नसून, आपलें जिवंत मरण झाकण्यासाठी व आपणास त्याची जाणीवहि न होऊं देण्यासाठीं आपल्या अंगावर चढविण्यांत आलेला तो एक दिखाऊ पेहराव आहे, याची गांधीजींना हळूहळू जाणीव होऊं लागली.

पण ही नवी जाणीव होण्यापूर्वी गांधीजींनी कस्तुरबावर 'अनन्वित अत्याचार' केले. कारण त्यावेळीं गांधीजींना कस्तुरबाला आपणांप्रमाणें सुजाण, सुशिक्षित व सुसंस्कृत बनवावयाचें होतें. आणि कस्तुरबांना हें असें बनविण्यासाठी गांधीजींना जें जें करावें लागलें या सर्वांचें स्वरूप 'अनन्वित अत्याचारांचें' होतें, 'हिंसेचें होतें' याची गांधीजींना पुढे जाणीव झाली. ब्रिटिश साम्राज्यशाहीने 'मागासलेल्या' हिंदुस्थानला सुजाण, सुशिक्षित व सुसंस्कृत करण्यासाठी कायदेशीर अत्याचारांचा मार्ग अवलंबिणें व आपण कस्तुरबाला सुधारण्याचा अट्टाहास करणें, या दोन गोष्टींत जें भयानक साम्य आहे, त्याची गांधीजींना अनुभवात्मक अशी सखोल जाणीव झाली. या जाणिवेतूनच गांधीजींना सत्य व अहिंसा या महान् प्रमेयांचें दर्शन घडलें.

हें नवें दर्शन घडतांच गांधीजींचा खास जीवनक्रमच आमूलाग्र बदलून गेला. सत्य व अहिंसा, हीं दोन मूलभूत तत्त्वें व हीं तत्त्वें प्रत्यक्ष जीवनांत आचरिण्यासाठी असहकार व सत्याग्रह हीं दोन साधनें अशा एका चतुर्गुणात्मक साकल्याचें स्वरूप गांधीजींच्या नव्या जीवनक्रमाला प्राप्त झालें.

गांधीजींच्या या नव्या जीवनक्रमाने सारा देश कसा हादरून सोडला, ही सर्वांच्या परिचयाची गोष्ट आहे. जागृत भारताची स्फूर्ति म. गांधी व म. गांधींचें स्फूर्तिनिधान कस्तुरबा, अशी वस्तुस्थिति आहे. एक महान् विभूति म्हणून गांधीजींना जगाच्या इतिहासांत अजरामर असें स्थान प्राप्त झालें आहे. जगाला म. गांधी थोर वाटतात. पण म. गांधींना मात्र कस्तुरबा हेंच आपल्या सर्वस्वाचें आधारस्थान असें वाटत असे. म. गांधींनी उदयास आणलेल्या स्वातंत्र्याच्या विराट् आंदोलनाकडे आपलें व जगाचें लक्ष जातें. पण या विराट आंदोलनाची स्फूर्ति गांधीजींना जेथून मिळाली तेथे मात्र आपलें व जगाचें लक्ष जात नाही; व पुढेहि जाईलसे वाटत नाही. एक साधीभोळी हिंदी स्त्री, यापलीकडे कस्तुरबांविषयींची आपली कल्पना जात नाही. पण साध्याभोळ्या हिंदी स्त्रीत्वामध्येंच साऱ्या भारतीय अस्मितेचें सार साठलें आहे, याची जाणीव आपणास व जगास न झाली तरी गांधीजींना मात्र ती निश्चितपणें झाली आहे.

आपण साध्याभोळ्या सामान्य जनतेशी ज्या वृत्तीने वागतो, त्या वृत्तींतूनच आपलें भलेंबुरें सामाजिक जीवन आकारास येत

असतें. साध्याभोळया सामान्यांच्या नित्याच्या जीवनाकडे प्रत्यही दुर्लक्ष व स्वातंत्र्याच्या, 'नव्या जगाच्या' अस्मानी वार्तावर काल्पनिक लक्ष, या दोहोंत जें अंतर राहतें त्यामुळे वास्तवाची जाणीव होणें आपणांस कठिण होतें. कस्तुरबांच्या साध्याभोळया जीवनक्रमाने व साध्याभोळया मानवी श्रद्धेने गांधीजींना जी जाणीव करून दिली, तिच्यांतून आपणांस दिसणारें गांधीजींचें थोर महात्म्य उदयास आलें. गांधीजी आतां केवळ स्वातंत्र्याच्या, केवळ नव्या जगाच्या अस्मानी बाता करीत नाहीत. तर दैनंदिन जींवनांतील प्रत्येक कृतींत जाणिवेचा जीव ओतण्याचा ते प्रयत्न करीत असतात. अजाण अशिक्षितांनी कष्ट करीत रहावें व आपण मात्र ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत रहावें, या दोहोंतील विसंगति नष्ट करणें हेंच महात्माजींच्या नव्या जीवनक्रमाचें सार आहे. कायदेशास्त्र व राज्यशास्त्र यांच्यावर भाष्यें लिहून शब्दसृष्टीचे चमत्कार करीत बसण्यापेक्षा आपल्या 'बा'ला जें करतां येतें तेंच आपण करावें, असें गांधीजींना वाटूं लागलें.

असें ज्या क्षणापासून वाटूं लागलें त्या क्षणापासूनच त्यांच्या नव्या जाणिवेचा विकास होऊं लागला. 'बा' अथवा कुणीहि साधीभोळी, सामान्य, खेडवळ, हिंदी स्त्री नित्य कष्ट करीत असते व सर्व कुटुंबियांच्या खस्ता खातखात नित्य देह झिजवीत असते. इतरांच्यासाठी असा नित्य देह झिजविणें हेंच त्यांचें जीवन हाच त्यांचा धर्म. हेंच त्यांचें तत्त्वज्ञान. या कष्टाळू व खडतर जीवनांत मानवता आहे, मानवतेबद्दलची जी अढळ अशी श्रद्धा आहे, तिचें दर्शन गांधीजींना 'बा' मुळे घडलें, म्हणूनच महात्माजींच्या

पूर्वश्रमींच्या उथळ अशा आधुनिक जीवनक्रमांत आमूलाग्र क्रांति घडून आली.

गांधीजी नित्य सूत कातीत असतात. लोकांना वाटतें हें एक ढोंग आहे, वेड आहे. पण गांधीजींच्या दृष्टीने हें एक प्रायश्चित्त आहे. अखंड व कंटाळवाणें कष्ट सोसणाऱ्या व आपल्या सुखांच्या जीवनासाठी अविरत खस्ता खाणाऱ्या, साध्याभोळ्या व अतिसहन-शील 'बा'वर आपण आपल्या अहंभावाच्या तोऱ्यांत जे 'अनन्वित अत्याचार' केले त्याचें अल्पसें परिमार्जन म्हणजेच गांधीजींचें अखंड सूत कातणें होय. आपल्या अहंभावाच्या बेफाम आविष्कारासाठी आपण जी 'बा'वर अनेकदा हिंसा केली, तिचें अल्पसें परिमार्जन म्हणजे गांधीजींची 'अहिंसा' होय.

आपण अनेक वर्षे अहंतेच्या तिमिरांत राहून व साध्याभोळ्या सामान्य अशा 'बा'च्या जीवनाकडे दुर्लक्ष करून सत्याची जी नित्य विटंबना केली तिचें अल्पसें परिमार्जन म्हणजे महात्माजींचें 'सत्य' होय.

'बा'च्या व आपल्या मनांत विरोध निर्माण झाल्यास आपलें मत तिच्यावर जबरीने लादीत बसण्यापेक्षां सहकार अशक्य होतांच फक्त 'असहकार' करणें यापलीकडे एका व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीवर अधिक कांही लादण्याचा यत्किंचित्‌हि अधिकार नाही, याची जळ-जळती जाणीव म्हणजेच गांधीजींचा इतिहासप्रसिद्ध असहकार होय. मानवांमानवांच्या नात्यांत–मग ते स्वकीय असोत अथवा परकीय असोत–जुलुम, जबरदस्ती, अत्याचार अथवा इतर कोणत्याहि प्रकारची

हिंसा यांना यत्किंचित् स्थान उरता कामा नये, हीच खरी मानवता. या मानवतेचा नित्य आग्रह धरणें हाच महात्माजींचा इतिहासप्रसिद्ध सत्याग्रह होय.

आपल्याला व जगाला वाटतें की, अर्ध्या जगावर साम्राज्य गाजविणाऱ्या बलाढ्य अशा ब्रिटिश साम्राज्यशाहीशी महात्माजी धैर्यानें झगडतात म्हणून ते फार थोर आहेत. परंतु चाळीस कोट दलित जनतेचें खरें दैनंदिन जीवन म्हणजे आपल्या साध्याभोळ्या, असहाय्य, अशिक्षित अशा 'बा'चें जीवन होय; 'बा'च्या या साध्या-भोळ्या जीवनावर आपण आघात करतांच तिने 'असहकार' व 'सत्याग्रह' या दोन मानवी साधनांनी आपल्या आघातांना उत्तर दिलें. असहाय सामान्यांच्या प्रतिकारांचीं हीं दोन मानवी शस्त्रें 'बा' नेच गांधीजींना दिलीं. ब्रिटिश साम्राज्यशाही सरकार हें 'बा'प्रमाणें असहाय असलेल्या चाळीस कोटी जनतेवर कायद्याच्या, शांततेच्या व सुव्यवस्थेच्या नांवावर अत्याचार करूं लागलें, तेव्हां त्या असहाय जनतेच्या वतीने महात्माजी माणुसकीच्या जीवनासाठी, केवळ 'बा'ने दिलेल्या या दोन मानवी शस्त्रांचा अवलंब करून बलाढ्य साम्राज्य-शाहीचा प्रतिकार करूं लागतात. अशा रीतीने गांधी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी झगडूं लागले की, आपल्याला व जगाला ते एक थोर पुरुष वाटूं लागतात. पण गांधीजी मात्र फक्त आपल्या 'बा'ची शिकवण आचरण्यांत आणण्यापलीकडे दुसरें कांहींच कधी करीत नसतात !

आपल्या देशांतील घरांघरांत गांधीजींसारखी महान् विभूति

नसेल, परंतु 'बा' सारखी साधीभोळी स्त्री मात्र आपल्या प्रत्येक घरांत आढळून येईल. आपल्या घरांघरांतील 'बा'च्या सामान्य जीवनांतील मानवी मूल्यांचें दर्शन करून घेणारे पुरुष जर निर्माण होतील तर आपल्या देशांतील प्रत्येक घरांत एकेक महात्मा सहज उदयास येऊं शकेल. आणि मग घरांघरांत नित्य वावरणाऱ्या 'बा'च्या दैनंदिन जीवनमूल्यांचें दर्शन घडल्यामुळें सचेतन झालेले हे हिंदी लोक, केवळ ब्रिटिश साम्राज्यशाहीशीच नव्हे, तर जगांतील सर्व अत्याचारी व संहारक शक्तींशी सामना करण्यास समर्थ होतील. हें असें झालें तरच 'बा'च्या वीर मरणाला अमरत्व प्राप्त होईल!

अमर मृत्यूचें निशाण उंच उभवून 'बा' पुढे निघून गेली. हें निशाण अखंड उंच फडफडत ठेवणें हेंच आपलें कर्तव्य आहे!

